रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २४९
www.ramprahar.com
गुरुवार, २८ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भाजपकडून अमरावतीमध्ये नवनीत राणांना उमेदवारी



**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली सातवी यादी बुधवारी (दि.२७) जाहीर केली. या यादीत महाराष्ट्राच्या अमरावती लोकसभा मतदारसंघातून खासदार नवनीत राणा यांना भाजपने अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले आहे. खासदार नवनीत राणा या मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यावर अपक्ष निवडणूक लढून जिंकल्या होत्या. आता त्या भाजपकडून कमळ चिन्हावर निवडणूक लढवतील. भाजप नेतृत्वाने खासदार नवनीत राणांवर विश्वास दाखवत त्यांच्या उमेदवारीची घोषणा केली. याबद्दल खासदार राणा यांनी आभार मानले आहेत. या यादीत खासदार राणा यांच्या नावाच्या व्यतरिक्त गोविंद करजोल यांच्या नावाचाही समावेश आहे. त्यांना भाजपने कर्नाटकातील चित्रदुर्ग मतदारसंघातून संधी दिली आहे.

### अंतरंग
पोलादपूरनजीक दोन कारच्या अपघातात नऊजण जखमी/२
मुरूडमध्ये एलईडी मासेमारी करणाऱ्या बोटी ताब्यात/५
वाडगाव संघाने पटकाविले बीपीएलचे विजेतेपद/८

# ठाकरे गटाची यादी जाहीर; काँग्रेस नाराज

## वडेट्टीवार, थोरातांनी करून दिली आघाडी धर्माची आठवण

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे गटाने आपल्या १७ उमेदवारांची पहिली यादी बुधवारी (दि.२७) जाहीर केली, मात्र यानंतर काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि बाळासाहेब थोरात यांनी ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना आघाडी धर्माची आठवण करून दिली आहे.

महाविकास आघाडीच्या जागांच्या संदर्भात अंतिम निर्णय व्हायचा बाकी असताना तसेच चर्चा संपली नसताना उद्धव ठाकरेंनी अतिरिक्त दोन जागांवर उमेदवार घोषित केले आहेत. त्यांनी आघाडीचा धर्म पाळला असता तर आनंद झाला असता. तीन पक्ष मिळून निर्णय घ्यायचा असतो. चर्चा संपलेली नसताना उमेदवारी



घोषित करणे हे आघाडी धर्माला गालबोट लावण्यासारखे आहे. यावर उद्धव ठाकरेंनी पुनर्विचार केला पाहिजे, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

बाळासाहेब थोरात यांनीही, आघाडी धर्म हा प्रत्येकाने पाळला पाहिजे. दुर्दैवाने शिवसेनेची जी यादी जाहीर झाली त्यात सांगली, धाराशीवची जागा जाहीर करणे योग्य नाही, कारण आमची चर्चा अजून सुरू आहे. आघाडी धर्म प्रत्येकाने पाळला पाहिजे. जी यादी जाहीर केली त्याबाबत त्यांनी फेरविचार केला पाहिजे, असे सांगत नाराजी व्यक्त केली.

काँग्रेस नेते संजय निरुपम यांनी तर पत्रकार परिषद घेत हे आघाडीच्या धर्माचे उल्लंघन असल्याची टीका करताना ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांना 'खिचडी चोर' म्हटले आहे. आम्ही खिचडी चोरासाठी काम करणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### बंडखोरीच्या ग्रहणाचीही शक्यता

उद्धव ठाकरे गटाकडून राज्यातील १७ जागासांठी उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. एकीकडे या उमेदवारी यादीवरून काँग्रेसने नाराजी व्यक्त केली असताना काही जागांवरून ठाकरे गटातच वाद समोर येऊ लागले आहेत. नाशिकमधून सिन्नरचे माजी आमदार राजाभाऊ वाजे यांना उमेदवारी दिल्याने लोकसभा संघटक विजय करंजकर यांनी बंडाचे हत्यार उपसले आहे. मी लढणार आणि नडणार, असा इशारा देत करंजकर यांनी बंडखोरीचे संकेत दिले आहेत. पक्षात घातकी निर्णय घेतले जात असल्याने ते पक्षासाठी चांगले नाही, अशी खंतदेखील या वेळी करंजकर यांनी व्यक्त केली. अशा प्रकारे बंडखोरी झाल्यास ठाकरे गटाच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

## प्रकाश आंबेडकर यांचा महाविकास आघाडीला दे धक्का!

### वंचित बहुजन आघाडीचे आठ उमेदवार रिंगणात

**मुंबई : प्रतिनिधी**

जागावाटपाचे निश्चित होत नसल्याने अल्टिमेटम देणारे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या आठ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. उद्धव ठाकरे गटाने लोकसभेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर आंबेडकर यांनी 'एकला चलो रे'ची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.



प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी (दि.२७) अकोला येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, वंचित बहुजन आघाडीच्या राज्य समितीची काल बैठक घेतली. या बैठकीत आगामी निवडणूक लढण्यासंदर्भात आम्ही काही निर्णय घेतले आहेत. आमच्याबरोबर जे आघाडी करण्यासाठी इच्छूक होते त्यांना आम्ही सांगितले की, महाराष्ट्रातील जरांगे-पाटील फॅक्टर लक्षात घ्यावा, पण तो फॅक्टर लक्षात घेतला गेला नाही. पहिल्या टप्प्यातील अर्ज भरण्याची मुदत संपत आहे, पण दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यासाठी विचारविनिमय करून अर्ज भरू.

## भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी कटिबद्ध

### पंतप्रधान मोदींची ग्वाही

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भ्रष्टाचाराविरोधातील लढाईत काळा पैसा जमविणाऱ्यांवर केंद्र सरकारकडून ईडीच्या (सक्तवसुली संचालनालय) माध्यमातून कारवाया केल्या जात आहेत. यावरून विरोधक मात्र सरकारवर टीका करतात. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि.२७) एक मोठे वक्तव्य केले. भाजप देशातील भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी कटिबद्ध आहे. पश्चिम बंगालमधील गरिबांकडून लुटलेला आणि ईडीने जप्त केलेला पैसा लोकांना परत करणार, असे पीएम मोदींनी म्हटल्याचे वृत्त एएनआय वृत्तसंस्थेने दिले आहे.



कृष्णनगर लोकसभा मतदारसंघात तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा यांच्या विरोधात भाजपने राजघराण्यातील सदस्य अमृता रॉय यांना उमेदवारी दिली आहे. पंतप्रधान मोदींनी बुधवारी (दि.२७) अमृता यांच्याशी फोनवरुन संवाद साधला. या वेळी ते म्हणाले, ईडीने पश्चिम बंगालमध्ये तीन हजार कोटी रुपये जप्त केले आहेत. हा गरिबांचा पैसा आहे. माझी इच्छा आहे की, नवीन सरकार बनताच गरीब जनतेचा पैसा त्यांना परत केला जावा. यासाठी मी कायदेशीर सल्ला घेतोय. बंगालच्या लोकांनी विश्वास ठेवावा की, ईडीने जप्त केलेले तीन हजार कोटी रुपये परत करण्यासाठी भाजप सरकार काही ना काही मार्ग शोधेल.

पंतप्रधान मोदी आणि अमृता रॉय यांच्यातील चर्चेची माहिती देताना भाजप नेत्यांनी सांगितले की, राज्यात नोकऱ्या देण्यासाठी तृणमूलने सुमारे तीन हजार कोटी रुपये लाटले. पंतप्रधान मोदींनी राजमाता अमृता रॉय यांना सांगितले की, भ्रष्टाचाऱ्यांनी सर्वसामान्यांचा पैसा लुटला आहे. सध्या हा पैसा ईडीकडे आहे. तो गरीब जनतेला परत केला पाहिजे यासाठी ते कायदेशीर पर्याय शोधत आहेत.

## अटकेच्या निर्णयाविरोधात केजरीवालांना दिलासा नाही!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



मद्यविक्री धोरणप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिलासा दिला नाहीये. केजरीवाल यांच्या अटकेच्या निर्णयाला आपकडून उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले होते, मात्र न्यायालयाने त्यांना कोणताही दिलासा दिलेला नाहीये. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३ एप्रिल रोजी होणार आहे.

न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. केजरीवाल यांची ईडी कोठडी २८ मार्च रोजी संपत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ईडी गुरुवारी केजरीवाल यांना राऊस एव्हेन्यू कोर्टात हजर करणार आहे. त्याचवेळी केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

## दिग्गज नेत्यांच्या तोफा धडाडणार!

### भाजपकडून ४० स्टार प्रचारकांची नावे घोषित

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने ४० स्टार प्रचारकांची नावे जाहीर केली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शाह यांसारख्या देशपातळीवरील नेत्यांसह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार तसेच अन्य नेत्यांची नावे आहेत.

भाजप महायुतीने देशात ४०० पार, तर महाराष्ट्रात ४५+चा नारा दिला आहे. उमेदवार जिंकून आणण्यासाठी महायुतीने रणनीती आखली असून उमेदवारांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारकांची



यादी भाजपने जाहीर केली आहे. या यादीत केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, नितीन गडकरी, रामदास आठवले, नारायण राणे, अनुराग ठाकूर, ज्योतिरादित्य शिंदे, स्मृती इराणी, रावसाहेब दानवे-पाटील, पियूष गोयल, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णूदेव साय, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, भाजप नेते शिवराजसिंह चौहान, सम्राट चौधरी, अशोक चव्हाण, विनोद तावडे, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, के. अण्णामलई, मनोज तिवारी, रवी किशन, अमर साबळे, विजयकुमार गावित, अतुल सावे, धनंजय महाडिक यांचाही समावेश आहे.

### निवडक

#### पंजाबमधील आपच्या खासदार, आमदाराचा भाजपमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली** : पंजाबमध्ये काँग्रेसनंतर आम



आदमी पक्षालाही मोठा धक्का बसला आहे. आपचे जालंधरचे खासदार सुशील कुमार रिंकू यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्याशिवाय आमदार शीतल अंगुरल यांनीही 'कमळ' हाती घेतले. या दोघांना भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे आणि पंजाब प्रदेशाध्यक्ष सुनील जाखड यांनी पक्षाचे सदस्यत्व दिले. या वेळी केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरीही उपस्थित होते.


#### छत्तीसगडच्या बिजापूरमध्ये सहा नक्षलवाद्यांचा खात्मा

**रायपूर** : छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात बुधवारी (दि. २७) सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. यात एका महिला कॅडरसह सहा नक्षलवादी ठार झाले आहेते. बासागुडा पोलीस ठाणे हद्दीत चिकुरबत्ती आणि पुसबाका गावाच्या जंगलात केलेल्या या कारवाईत डीआरजी, सीआरपीएफ आणि विशेष बटालियन कोब्रा या पथकांचा सहभाग होता.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी विकसित भारत संकल्पाचे सरसेनापती

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन; शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल





**नागपूर : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पाचे सरसेनापती आहेत. त्यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२७) नागपूर येथे केले. नागपूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपब्लिकन पक्ष महायुतीचे उमेदवार केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या विशाल जाहीर सभेत उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या सभेला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल, रामटेकचे महायुतीचे उमेदवार राजू पारवे, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे नेते माजी खासदार जोगेंद्र कवाडे, सुलेखा कुंभारे यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षांतील नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेनंतर महायुतीने विधान भवन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रचंड शक्तिप्रदर्शन करीत काढलेल्या भव्य मिरवणुकीने मंत्री गडकरी यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला.

अर्ज दाखल करताना मंत्री गडकरी यांच्यासमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल उपस्थित होते.

जाहीर सभेत उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने केलेले कार्य हा एक ट्रेलर आहे. देशाला विकसित, सामर्थ्यशाली बनवण्यासाठी अजून बरेच काही घडायचे आहे. मोदींजींच्याच नेतृत्वाखाली पुढच्या पाच वर्षांत गरीबीमुक्त, बेरोजगारीमुक्त व समतायुक्त भारत घडवायचा आहे. पंतप्रधान मोदींनी २०४७पर्यंत विकसित भारत बनवण्याचा संकल्प केला आहे. त्याची मुहूर्तमेढ पुढच्या पाच वर्षांत रोवली जाणार असून त्यासाठी मोदीजींना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवायचे आहे.

दरम्यान, भंडारा-गोंदिया मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार सुनील मेंढे यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# लोकसभा निवडणुकीसाठी रायगडात विविध पथकांची स्थापना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीदरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर तसेच निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात विविध पथकांची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

जिल्ह्यातील रायगड आणि मावळमधील पनवेल, कर्जत, उरण या विधानसभा मतदार संघांतर्गत एकूण ५३ भरारी पथके (एफएसटी), ७६ स्थिर सर्वेक्षण पथके, (एसएसटी) ३२ व्हिडीओ सर्वेक्षण पथके (व्हिएसटी) आणि आठ व्हिडीओ पाहणी पथके (व्हिव्हिटी) स्थापन करण्यात आली आहेत, तर आठ खर्च सनियंत्रण पथके स्थापन करण्यात आली आहेत. यासाठी एकूण ७२८ अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात सहा एफएसटी, आठ एसएसटी, चार व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. कर्जत मतदारसंघात सहा एफएसटी, सहा एसएसटी, चार व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. उरण मतदारसंघात सहा एफएसटी, सहा एसएसटी, सहा व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. पेण मतदारसंघात सात एफएसटी, २१ एसएसटी, चार व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. अलिबाग मतदारसंघात १२ एफएसटी, आठ एसएसटी, चार व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. श्रीवर्धन मतदारसंघात १० एफएसटी, १५ एसएसटी, चार व्हिएसटी, प्रत्येकी दोन व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. महाड मतदारसंघात सहा एफएसटी, १२ एसएसटी, सहा व्हिएसटी, प्रत्येकी एक व्हिव्हिटी आणि खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे.

खर्च संनियंत्रणासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. एफएसटी, एसएसटी, व्हिएसटी, व्हिव्हिटी, माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते.

या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाच्या घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल ॲप, नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात.

उमेदवार,राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या जाहीर सभा, रॅली यांचे व्हिडीओ चित्रीकरण व्हिएसटीच्या माध्यमातून केले जाते व त्याची पाहणी व्हिव्हिटीकडून केली जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात व्हिएसटी आणि व्हीव्हीटी नेमण्यात आल्या आहेत. या पथकाची निरीक्षणे खर्च पथकासाठी उपयुक्त ठरतात.




**पनवेल** : तुकाराम बीजनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तालुक्यातील कोपर येथील मंदिरात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, माजी उपसरपंच विजय घरत, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, किशोर पाटील, साईचरण म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सांगलीच्या जागेवरून काँग्रेस आक्रमक

## वेळ पडल्यास कोणत्याही लढाईसाठी तयार –विशाल पाटील

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सांगली लोकसभेच्या जागेवरून महाविकास आघाडीत निर्माण झालेला तिढा अद्याप सुटलेला नाही. ठाकरे गटाकडून बुधवारी (दि.२७) प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवार यादीत सांगलीतून चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती, मात्र काँग्रेस पक्ष सांगलीची जागा ठाकरे गटासाठी सोडायला तयार नाही. त्यासाठी काँग्रेस नेते विश्वजीत कदम आणि इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांनी थेट दिल्लीत जाऊन पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांची भेट घेतली. या वेळी विश्वजीत कदम यांनी आक्रमक भूमिका घेत सांगलीची जागा काँग्रेसचीच आहे, असे ठणकावून सांगितले.



गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसचे विशाल पाटील हे सांगलीतून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी तयारी करीत होते. सांगलीचा पुढचा खासदार विशाल पाटील हेच असतील, अशी खात्रीही अनेकांना होती, मात्र उद्धव ठाकरे यांनी सांगलीच्या जागेसाठी परस्पर चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा केली होती. बुधवारी ठाकरे गटाने प्रसिद्ध केलेल्या उमेदवार यादीत सांगलीच्या जागेसाठी चंद्रहार पाटील यांचेच नाव होते, पण काँग्रेस पक्ष ही जागा सोडायला तयार नाही. उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर काँग्रेसचे प्रमुख नेते नाराज झाले होते. त्यांच्या या नाराजीला न जुमानता ठाकरे गटाच्या उमेदवारी यादीतही सांगलीसाठी चंद्रहार पाटील यांनाच उमेदवारी दिल्याने हा वाद चिघळला आहे.

विश्वजीत कदम यांनी बुधवारी दिल्लीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी सांगली लोकसभेच्या जागेवर काँग्रेसचाच हक्क कसा आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी म्हटले की, मी आज दिल्लीत काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली आहे. सांगली हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला हवा आहे. या ठिकाणी निवडणूक लढवण्यासाठी आम्ही सक्षम आहोत, असे आम्ही मल्लिकार्जून खरगे यांना सांगितले. विशाल पाटील यांची उमेदवारी मी आणि आमच्या सहकाऱ्यांनी निश्चित केली आहे. शेवटचा पर्याय म्हणून आम्ही सांगलीत ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये मैत्रीपूर्ण लढतीसाठी तयार आहोत. पक्षाचा आदेश मिळाल्यानंतर आम्ही योग्य ते करू. आता सांगली जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते, विशाल पाटील आणि आम्ही सगळे मिळून पुढील निर्णय घेऊ, असे विश्वजीत कदम यांनी सांगितले.

### 'काँग्रेसचे वरिष्ठ शिवसेना नेत्यांशी बोलणार'

सांगली लोकसभा मतदारसंघाची जागा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ आहे. या मतदारसंघात काँग्रेसला पोषक वातावरण आहे. ही जागा काँग्रेससकडे राहावी, अशी मागणी आम्ही वरिष्ठांकडे केली. ठाकरे गटाने जाहीर केलेला उमेदवार महाविकास आघाडीचा नाही. कोल्हापूरच्या बदल्यात सांगली असे कधीही ठरले नव्हते. शाहू महाराज ज्या पक्षातून लढतील त्या पक्षाला ती जागा द्यावी, असे ठरले होते. या जागेबाबत काँग्रेसचे वरिष्ठ हे राज्यातील नेत्यांशी आणि शिवसेना नेत्यांशी बोलतील, असे आश्वासन आम्हाला आज देण्यात आल्याचे विश्वजीत कदम यांनी या वेळी सांगितले.

# उबाठाची यादी म्हणजे पराभवाची पहिली पायरी

## मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

एक खिचडीतील भ्रष्टाचारी, एक जुना राष्ट्रवादी यांनी घेतला कडेवरी आणि एक बांडगूळासारखा आमच्या मतांचा त्यावेळचे वाटेकरी.... उबाठाची आजची यादी म्हणजे पराभवाची पहिली पायरी, अशी टीका भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली आहे.

उबाठा गटाच्या उमेदवारांची पहिली यादी बुधवारी (दि.२७) जाहीर झाली. त्यामध्ये पराभवाची पायाभरणीच करण्यात आली आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीसोबत ज्या पद्धतीने अहंकाराने वागत आहेत, त्यावरून आता काँग्रेसलाही कळेल आणि महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसांनाही



कळून चुकले आहे की, उबाठा गट म्हणजे अहंकाराने भरगच्च भरलेला फुगा आहे, अशी टीका आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली आहे.

सभांसाठी छत्रपती शिवाजी महाराज पार्कची मागणी करणाऱ्या उबाठा गटाचा समाचार घेताना आमदार अ‍ॅड. शेलार म्हणाले की, लोकसभेची लढाई या वेळी देव-देश-धर्मासाठी आहे. त्यामुळे हिंदू शक्तीचा पराभव करण्यासाठी निघालेल्या अधर्मवादी शक्तींना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचे आमचे दादरचे ऐतिहासिक मैदान हवे कशाला?

उबाठा गटाला पुन्हा एकदा इंडिया आघाडी नावाचा दहा तोंडी रावण छत्रपती शिवाजी महाराज मैदानात उभा करून हिंदू शक्तीला पराभव करण्याचे ऐलान करायचे आहे काय? छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वंशजांकडे पुरावे मागणाऱ्यांना... स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अपमान करणाऱ्यांना... हे मैदान देऊ नये...! ऐतिहासिक शिवतीर्थ तर मावळ्यांचे पालिकेने का पुरवावे डोहाळे या डोम कावळ्यांचे? अशा शब्दांत आमदार अ‍ॅड. शेलार यांनी हल्लाबोल केला आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर दोन कारची धडक

## नऊजण जखमी; पोलादपूरनजीक लोहारे येथील घटना

**पोलादपूर : प्रतिनिधी**

टाटा नॅनो कारमध्ये तब्बल नऊ प्रवासी घेऊन जाताना बुधवारी (दि.२७) दुपारी ४.३० वा.च्या दरम्यान तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर लोहारमाळनजीक झायलो कारला मागून धडक दिली. या भीषण अपघातात नॅनो कारमधील सर्व नऊजण गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. हे प्रवासी दापोली तालुक्यातील शिवनारी सुतारवाडी येथील रहिवासी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



महाड तालुक्यातील बारसगाव तळीये येथे टाटा नॅनो कार (एमएच ०६ बीई ७६०५)ने लग्न समारंभासाठी गेलेले कुटूंबिय दापोलीकडे परताना चालक सुमित विष्णू कासेकर (वय ३२, शिवनारी,सुतारवाडी, ता. दापोली) हा लोहारमाळ गावाच्या हद्दीत आला असता, रस्त्याच्या कडेला उभी असणारी झायलो कार (एमएच ०४ इडी ००६४)वर आदळून अपघात झाला.

या अपघातात चालकासह प्रियंका भूषण कासेकर (वय ३०), शिवांश भूषण कासेकर (वय ४), आदित्य सुमित कासेकर (वय ४), मयुरी भूषण सुतार (वय २७), भूषण दत्ताराम कासेकर, पल्लवी सुमित कासेकर, आराध्या भूषण कासेकर (वय ९), संपदा दिलीप देवघरकर (वय २७) असे एकूण नऊजण जखमी झाले. सर्व जखमींवर पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर राजेश सलागरे व त्यांच्या टीमने उपचार करून अधिक उपचारासाठी डेरवण येथे हलविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

या घटनेची माहिती समजताच पोलीस निरीक्षक अनिल जाधव, भरत घुले, स्वप्नील कदम, परेश मोरे, रवींद्र सर्णेकर, जयश्री सर्णेकर, दराडे वाहतूक शाखेचे धायगुडे, कशेडी वाहतूक मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक धडे तसेच लोहारे ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले.

# माजी हवाई दल प्रमुख भदौरिया भाजपमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. अशा परिस्थितीत भारतीय जनता पक्षात सुरू असलेली इनकमिंग थांबायचे नाव घेत नाही. आता भारताचे माजी हवाई दल प्रमुख राकेश कुमार सिंह भदौरिया यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या उपस्थितीत भदौरिया यांनी पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. या वेळी वायएसआरसीपी नेते वरप्रसाद राव वेलागपल्ली यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर आणि पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी या दोन्ही नेत्यांचे पक्षात स्वागत केले. या वेळी अनुराग ठाकूर म्हणाले की, आरकेएस भदौरिया आणि व्ही प्रसाद राव यांचे जगातील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षात स्वागत आहे. भदौरिया आत्मनिर्भर भारताच्या मोहिमेत खूप सक्रिय आहेत. आता त्यांचे योगदान राजकीय व्यवस्थेत असणार आहे. व्ही. प्रसाद राव यांच्याबाबत बोलताना ठाकूर म्हणाले की, मोदीजींच्या विकसित भारताच्या संकल्पाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रसाद राव भाजपमध्ये आले आहेत तसेच सरकारचे कौतुक करताना ते म्हणतात, मोदीजींच्या नेतृत्वाखाली देश सुरक्षित आहे. यामुळेच आरकेएस भदौरियांसारखे लोकही भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत.

### 'विकसित भारताचा संकल्प पूर्ण करू'

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आरकेएस भदौरिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांचे आभार मानले आहेत. भारतीय हवाई दलात मी चार दशकांहून अधिक काळ सेवा केली, मात्र भाजपच्या नेतृत्वाखालील आठ वर्षे माझ्या सेवेचा सर्वोत्तम काळ होता. सरकारने देशाच्या सशस्त्र दलांचे बळकटीकरण तसेच त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी उचललेल्या पावलांमुळे लष्कराच्या क्षमतेत वाढ झाली आहेच, शिवाय सैन्याला नवा आत्मविश्वासही मिळाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकसित भारताचा संकल्प पूर्ण करू, अशी प्रतिक्रिया त्यांनी या वेळी दिली.

भदौरिया पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे विद्यार्थी आहेत. भदौरिया सप्टेंबर २०२१मध्ये हवाई दलातून निवृत्त झाले होते. त्यांना संरक्षण सेवेचा चार दशकांहून अधिक अनुभव आहे. ४२५० तासांहून अधिक उड्डाण केले असून २६ विविध प्रकारच्या लढाऊ विमानांचा त्यांना अनुभव आहे. भदौरिया यांनी मार्च २०१७ ते ऑगस्ट २०१८पर्यंत सदर्न एअर कमांडचे कमांडिंग-इन-चीफ म्हणून काम केले. ३६ वर्षांच्या कारकिर्दीत आरकेएस भदौरिया यांना अतिविशिष्ट सेवापदक, वायुसेना पदक आणि परम विशिष्ट सेवा, अशा पदकांनी सन्मानित करण्यात आले.

# भाजपतर्फे राज्यात होणार २१ हजार नमो संवाद सभा

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपतर्फे राज्यात स्टार प्रचारकांच्या सभांबरोबरच पक्ष संघटनेच्या शक्ती केंद्र पातळीवरील २१ हजार नमो संवाद सभांचे आयोजन केले जाणार आहे. नमो संवाद सभांच्या माध्यमातून एक कोटी मतदारांपर्यत पोहचण्याचे लक्ष्य आहे, अशी माहिती प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी बुधवारी (दि.२७) दिली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान या वेळी उपस्थित होते.




पाटील पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार मोहिमेत राष्ट्रीय आणि प्रदेश पातळीवरील अनेक महत्त्वाचे नेते सहभागी होतील. त्याच्या बरोबरीने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत थेट पोहचण्यासाठी नमो संवाद सभांचे आयोजन केले जाणार आहे. मतदानाच्या टप्प्यांनुसार या नमो संवाद सभांचे वेळापत्रक बनवण्यात येणार आहे. २१ हजार शक्ती केंद्रांवर होणाऱ्या या सभांमध्ये ३००पेक्षा अधिक वक्ते सहभागी होणार असून दररोज सात ते आठ सभा होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाजपचे विविध मोर्चे व प्रकोष्ठ यांच्या माध्यमातून फेरीवाले, व्यापारी, शिक्षक अशा समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. ग्रामीण भागामध्ये नमो चौपाल तर युवा पिढीशी संवाद साधण्यासाठी कॉफी विथ युथ असे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

# सराफ व्यावसायिकांच्या समस्या लागल्या मार्गी

## भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सराफांच्या समस्या व सुरक्षाविषयक निराकारण करण्याबाबत भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी पुढाकार घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून प्रश्न सोडविला आहे. यामुळे सराफ व्यावसायिकांनी भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

अनेक वेळा सराफ व्यावसायिकांना किरकोळ कारणांमुळे अथवा खोट्या प्रकरणात पोलीस दुकानात येऊन धाक दाखवतात व पोलीस ठाण्यात नेतात. चुकीची वागणूक देऊन रिकव्हरीच्या नावाखाली टार्गेट केल्याची प्रकरणे राज्यात पूर्वी झाल्याची चर्चा होते. याला आळा बसावा व पोलीस हे रिकव्हरी ऑफीसर नसून ते फक्त तपास अधिकारी असू शकतात, अशा प्रकारचा शासन निर्णय राज्यपालांच्या आदेशानुसार राज्याचे उपसचिव राजेश गोविल यांच्या स्वाक्षरीने १४ मार्च रोजी काढण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर एक विषेश दक्षता समिती नेमून प्रत्येक पोलीस आयुक्त तसेच जिल्हास्तरावरही एक समिती स्थापन करण्याचे आदेशही या निर्णयात नमूद करण्यात आला आहे.

# विश्वनिकेतन महाविद्यालयात राष्ट्रीय हॅकेथॉन स्पर्धा

**खालापूर : प्रतिनिधी**

इंजिनियरिंग आणि टेकनॉलॉजीचा अगदी योग्य पद्धतीने वापर व्हावा या उद्देशाने वाटचाल करीत असलेल्या विश्वनिकेतन महाविद्यालयात हॅकेथॉन हॅक टू क्रॅक १.० या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रमोद दामले यांच्यासह महाविद्यालयाचे व्हॉइस प्रेसिडेंट डॉ. संदीप इनामदार, प्राचार्य बी. आर. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंटच्या डायरेक्टर प्रा. सुनीता जाधव, विभाग प्रमुख डॉ. अंकुश पवार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी डॉ. प्रमोद दामले यांनी, जुन्या काळात होत असलेला टेकनॉलॉजीचा वापर आणि आजच्या अद्यावत टेकनॉलॉजीचा विकास कसा होत गेला याबाबत सांगितले. या स्पर्धेचे आयोजन कॉम्पुटर सायन्स इंजिनियारिंग (एआयएमएल) डिपार्टमेंट आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंट यांच्या संयुक्त उद्यामाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला पीबीएलसिओईचे डायरेक्टर डॉ. विकास शिंदे, कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. कदम, प्राचार्य शिवानी अग्रवाल, सर्व विभागप्रमुख आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दिघा येथे पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया



**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे-बेलापूर मार्गावरील दिघा रेल्वे स्थानकासमोर मुकुंद कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत वळणार एका खासगी कंपनीचे खोदकाम सुरू असताना पाईपलाईन फुटून लाखो लीटर पाणी वाया गेले आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यातील येथे पाईपलाईन फुटल्याचा हा दुसरा प्रकार घडला आहे. दिघा विभागातील प्रभाग क्रमांक १ व २ मध्ये खासगी कंपन्यांकडून केबल टाकण्यासाठी खोदकाम करण्यात येत आहे. सततच्या खोदकामामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.

दिघा विभाग कार्यालयांतर्गत मुकुंद कंपनी आणि परिसरात टेलिकॉम कंपनीकडून ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे काम सुरू आहे. या कंपनीचे मुकूंद कंपनी गेट दिघा रेल्वे स्थानकासमोर केबल टाकण्याचे काम सुरू असताना बुधवारी दुपारच्या सुमारात ड्रिलच्या सहाय्याने खोदकाम करताना साठेनगर मुख्य जलकुंभाला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी निष्काळजीपणामुळे फुटली. त्यामुळे मुकुंद कंपनी परिसरात रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते.

पाण्याची पाईपलाईन फुटल्याने या परिसराला तळ्याचे स्वरुप आले होते. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाण्याचा प्रवाह बंद करून संध्याकाळी उशिरापर्यत दुरुस्तीचे काम पूर्ण केले, परंतु ऐन उन्हाळाच्या दिवसाचा पाणीटंचाईचे संकट ओढावलेले असताना अशाप्रकारे पाईपलाईन फुटल्याचा महिनाभरातील हा दुसरा प्रकार असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी जोमाने सुरू आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि.२७) अलिबाग विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली, तसेच सुविधांचा आढावा घेतला. आवश्यकतेनुसार तत्काळ दुरूस्ती, डागडुजी करण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.



या वेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, नगर पालिकेच्या मुख्याधिकारी अंगाई सांळुखे आदी उपस्थित होते.

जावळे म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, सावली, दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांसाठी रॅम्प आदी सुविधा पुरविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक मतदान केंद्राचे सूक्ष्म नियोजन करून अंमलबजावणी करावी. पुरेसा सुर्यप्रकाश, रस्ते, विद्युतजोडणी, प्रकाश व्यवस्था या दृष्टीने नियोजन करावे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व देखभाल, दुरूस्त्या करून घ्याव्यात. मतदान केंद्रावर ठळक अक्षरात मतदार केंद्र क्रमांक, दिशादर्शक लावावेत. आयोगाच्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी अलिबाग तालुक्यातील बामनोली येथील चार केंद्र, वरसोली येथील सहा केंद्र, चेंढरे येथील दहा केंद्र, अलिबाग येथील सहा केंद्रांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली.

# पोलादपूरच्या ओंबळी येथील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आमदार भरत यांच्या उपस्थितीत होळी सणानिमित्त ओंबळी गावातील ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला. अतिदुर्गम भागात असलेल्या ओंबळी गावाकडे जाणारा रस्ता महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून करण्यात आल्याने आम्ही ओंबळीकर शिवसेनेत जाहीर प्रवेश करीत आहोत, असे ग्रामस्थांनी सांगितले.

या वेळी शिवसेना प्रवेशकर्त्यांचे भगव्या पताका घालून शिवसेना पक्षात आमदार गोगावले यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमसाठी सहसंपर्क प्रमुख किशोर जाधव, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख तसेच शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



# पनवेल मनपाकडून पर्यावरण संवर्धनाचा जागर

## पर्यावरण सेवा योजनेंतर्गत चार शाळांमध्ये व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचे महत्त्व शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.२७) महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, गुजराती शाळा, हुतात्मा हिरवे गुरूजी जीवन शिक्षण विद्यामंदिर, उर्दू शाळा याठिकाणी पर्यावरण विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवायोजना महापालिकेच्या वतीने पालिका कार्यक्षेत्रातील २५ माध्यमिक विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहेत. या पर्यावरण सेवा योजनांतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनुसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा स्पर्धांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, गुजराती शाळा, हुतात्मा हिरवे गुरूजी जीवन शिक्षण विद्यामंदिर, उर्दू शाळांमधील विद्यार्थ्यांना पर्यावरण सेवा योजनेची माहिती देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले, तसेच 'जल' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाण्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या वेळी चारही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवज्योतीचे पनवेलमध्ये उत्साहात स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वादळ शिवज्योत मंडळ शहाबाज यांच्या वतीने शिवजयंतीनिमित्त आग्राच्या लाल किल्ला ते शहाबाज अशा काढण्यात आलेल्या शिवज्योतीचे पनवेलमध्ये महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनी बुधवारी (दि.२७) स्वागत केले. १३०० किमीचे अंतर पार करून ही शिवज्योत आग्रावरून शहाबाज गावात पोहचणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या कैदेतून चतुराईने सुटका करून घेतली तो शिवप्रभुंच्या पदस्पर्शाने पावन झालेला आग्राचा लाल किल्ला ते शहाबाज या शिवज्योत पायी प्रवासाचे १६ ते २८ मार्चदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंती उत्सव साजरा करण्याचे मंडळाचे हे २०वे वर्ष आहे. या शिवज्योतीचे पनवेलमध्ये जंगी स्वागत करण्यात आले.

या वेळी भाजप ओबीसी कोकण विभाग संयोजिका सुहासिनी केकाणे, प्रभाग क्रमांक २० महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पाटील, सुपर वॉरियर किशोर मोरे, शैलेश पाटील, चंद्रकांत मंजुळे, कमलाकर घरत, विवेक पाटील, वेदांग पाटील, अशोक आंबेकर, हरिश्चंद्र पाटील, उदय पाटील, चेनत पाटील, गोविंद पाटील, दर्पण पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.



# मालमत्ता कर भरायचे शेवटचे चार दिवस शिल्लक

## नागरिकांना कर भरण्याचे महापालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे चार दिवस शिल्लक राहिले असून, मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार उच्च न्यायालयाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मालमत्ता कर भरण्यासाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख असून ज्या मालमत्ताधारकांनी आपले मोबाईल नंबर आपल्या खात्याशी कनेक्ट केले नाहीत



त्यांनी आपले मोबाईल नंबर अपडेट करून घ्यावे जेणे करून मालमत्ता कराचे बिल प्रत्यक्ष त्याच मालमत्ताधारकाच्या मोबाईलवर जाईल, तसेच मालमत्ता बिलात किरकोळ दुरूस्त्या असतील तर त्या तातडीने करून घ्याव्यात असे आवाहन मालमत्ता कर विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे चार दिवस राहिल्याने शनिवार व रविवार कार्यालये नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहे.

महापालिकेने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP मोबाईल ॲप विकसित केले आहे तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास (१८००-५३२०-३४०) या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. बुधवारी एकूण दोन कोटी ४० हजारांचा भरणा पालिकेच्या तिजोरीत झाला आहे.

# पनवेल मनपातर्फे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीचे नियोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून महापालिकेच्या सहकार्यातून १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने शहरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या मिरवणुकीची नियोजन बैठक आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात घेण्यात आली.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, कनिष्ठ अभियंता सुधिर साळंखे, समान्य प्रशासन प्रमुख दशरथ भंडारी प्रतिनिधी उपस्थित होते.

भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने नियमांच्या चौकटीत राहून कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग होऊ न देता जयंती साजरी करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.



विविध मंडळे, सामाजिक तसेच धार्मिक संस्थांना परवान्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित करून मिरवणूक मार्गाची पाहणी करणे, मिरवणुकीदरम्यान रूग्णवाहिका उपलब्ध ठेवणे अशा सूचना संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या.

यानिमित्ताने लेझीम पथक, चित्ररथ, ढोल पथक स्पर्धा तसेच शाळांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विजेत्यांना या वेळी पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास सकाळी ७.३० पुष्पहार अर्पण करून सकाळी ८ वाजता मिरवणूक सुरू होऊन सुमारे ११ वाजण्याच्या दरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे समाप्त होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा-शिवाजी चौक-एमटीएनएलसमोरील कॉंक्रीट रोड-संत जगनाडे चौक रोहिदास वाडा टपाल नाका कर्नाळा सर्कल भाजी मार्केट-कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा चौक- विरुपाक्ष मंदिर- आदर्श हॉटेल लाईन आळी- गुणे हॉस्पिटल या मार्गाने निघून मिरवणूकीचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे होणार आहे.

# जासई विद्यालयात डी. के. पाटील यांचा सेवापूर्ती समारंभ



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग विद्यालयात वरिष्ठ लेखनिक म्हणून काम करणारे ज्ञानेश्वर पाटील यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ उत्साहात झाला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात डी.के. पाटील यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेचे लाईफवर्कर व विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून निवृत्त होत असलेले डी. के. पाटील यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच डी. के. पाटील यांच्या कुटुंबीयांनी रयत शिक्षण संस्थेस हे विद्यालय सुरू करण्यासाठी मोफत एक एकर जागा देणगी म्हणून दिलेली आहे, अशा दानशूर घराण्याचा डि. के. पाटील सर वारसा जपत आहेत, असे गौरवोद्गार काढले.

रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक आणि रयत को. ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन नुरा शेख यांनीही डी. के. पाटील यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. डी. के. पाटील यांचा विद्यालयाच्या वतीने सपत्नीक सन्मान केला गेला. या कार्यक्रमासाठी रंजन ठाकूर, डी. जी. सोनवणे, तसेच डी. के. पाटील यांचे आप्तस्वकीय, सर्व सेवक आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूरा ठाकूर यांनी व आभार प्रदर्शन प्रा. अतुल पाटील यांनी केले.

# बॅटऱ्यांची वाहतूक करणाऱ्या ट्रकला आग

**उरण** : भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील जीडीएल या मालाची हाताळणी करणाऱ्या गोदामातून बंगलोर शहराकडे बॅटऱ्यांची वाहतूक करणाऱ्या ट्रकला मंगळवारी (दि. २६) रात्री ८.४५ वा. च्या सुमारास आग लागली.

मंगळवारी ट्रकचालक दिनेश रमेश घावटे (रा. कोलाड, रोहा) हा जीडीएल या मालाची हाताळणी करणाऱ्या गोदामातून विद्युत वाहक बॅटऱ्या घेऊन २५ ट्रक बंगलोरच्या दिशेने निघाले होता. तहान लागली म्हणून भेंडखळ बसस्थानकाजवळ पाणी घेण्यासाठी ट्रकमधून चालक उतरला. त्या वेळी ट्रकमधून धूर, वास येत असल्याचे निदर्शनास आले. चालकाने तातडीने जवळील पेट्रोल पंपावरील अग्नी प्रतिबंध उपकरणे घेऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. आग विझविण्यासाठी जमा झालेल्या एका नागरिकाने या घटनेची माहिती अग्निशमन यंत्रणेला दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले.



# ड्रग्जची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर भागात अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना खारघर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. सन्डे इजेको ओझोगू (४५) व पिटर मुनाचिमसो नॉफो (३५) अशी अटक केलेल्या दोघांची नावे असून त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ४० हजार रुपये किमतीचे मेफेड्रीन तसेच त्यांची दुचाकी जप्त करण्यात आली.

खारघर सेक्टर २० परिसरात जलवायू विहारच्या पाठिमागे दोन नायजेरियन नागरिक अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल आहेर व त्यांच्या पथकाने खारघर सेक्टर-२०मध्ये सापळा लावला होता. या वेळी त्या भागात संशयास्पदरित्या दुचाकीवरून आलेल्या सन्डे इजेको ओझोगू व पिटर मुनाचिमसो नॉफो या दोन नायजेरियन नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची तपासणी केली असता सन्डे इजेको ओझोगू याच्याजवळ प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ५६ ग्रॅम वजनाचा पाच लाख ६० हजारांचा एमडी सापडला, तर पिटरजवळ प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ५८ ग्रॅम वजनाचा पाच लाख ८० हजारांचा एमडी आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी दोघांकडे सापडलेले तब्बल ११ लाख ४० हजार रुपये किमतीचा एमडी जप्त करून दोघांनाही अटक केली.

दरम्यान खारघर येथील टॅक्सी स्टँडजवळ गांजा विक्रीसाठी आलेल्या मोहम्मद रफिक मोहम्मद सईद शेख (५२) याला खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले. खारघर पोलिसांनी रिक्षाची तपासणी केली असता, रिक्षाच्या ड्रायव्हर सीटखाली एका पिशवीमध्ये ३० हजार रुपये किमतीचा गांजा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी गांजासह त्याची रिक्षा जप्त करून मोहम्मद रफिक याला अटक केली.

# रानसईच्या आदिवासीवाड्यांवर पथनाट्यातून मतदान जनजागृती

**उरण : वार्ताहर**

भारतीय निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग, तहसील कार्यालय उरण व पंचायत समिती उरण शिक्षण विभागाच्या वतीने बुधवारी (दि.२७) रानसई येथील रानसई भागातील मार्गाची वाडी, खोड्याची वाडी, बंगल्याची वाडी, सागाची वाडी आदी आदिवासीवाड्यांवर पथनाट्यातून मतदान जनजागृती केली.

नवीन शेवे केंद्रातील शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुत्रधार मच्छिंद्र म्हात्रे, किशोर पाटील लिखित/ दिग्दर्शित मतदान जनजागृती पथनाट्य सादर केले. या पथनाट्याला आदिवासी बंधू भगिनींनी भरभरून प्रतिसाद दिला.

मतदारांच्या हातात वेगवेगळे बॅनर देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमास पंचायत समिती उरण शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे, तसेच साधन व्यक्ती ज्योती ठाकूर, ग्रुप ग्रामपंचायत रानसईच्या सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, रूपेश पाटील व गावातील मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.

या पथनाट्यामध्ये नवीन शेवे केंद्रातील किशोर पाटील, महेंद्र गावंड, नरेश म्हात्रे, विश्वनाथ पाटील, संजय होळकर, शिवप्रसाद पंडित, संगिता मेहत्रे, शर्मिला गावंड, प्रमिला गावंड, रूपाली पाटील, हार्मोनियम साथ देणारे रमण पंडित, ढोलकी वादक देविदास पाटील यांनी सहभाग घेतला.



# कडक उन्हामुळे सफेद कपड्यांच्या मागणीत वाढ

## बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाचा पारा सतत वाढत आहे. उन्हाच्या चटक्यापासून बचावासाठी नागरिकांकडून विविध उपाय केले जात आहे. त्यातीलच एक उपाय म्हणून पांढरे कपडे परिधान करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. त्यामुळे अशा कपड्यांच्या मागणीत वाढ झाली आहे.

उन्हाचा चांगला तडाखा जाणवत आहे. कामाव्यतिरिक्त नागरिक घराच्या बाहेर पडणे टाळत आहे. बहुतांशी भागातील रस्ते सुने पडले आहे. इतकेच नाही तर उन्हापासून बचावासाठी त्यांच्याकडून विविध उपाय अवलंबले जात आहे. पांढऱ्या कपड्यांनी उन्हाचा चटका कमी जाणवत असल्याने पांढरे शर्ट, पॅन्ट, बंडी तर महिलांकडून पांढरे टॉप, कुर्ता, पंजाबी ड्रेस, साडी, लेगीन्स परिधान



करण्याचे प्रमाण वाढले आहे.

बाजारात अशाप्रकारचे पांढरे कपडे खरेदीकडे कल वाढला आहे. दुकानांमध्येही पांढरे कपडे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली आहे. कॉटन (सुती) कपड्यांमुळे गरम होण्याचे प्रमाण कमी होते. उन्हाचा चटका जाणवत नाही. शिवाय त्यांचे वजनही कमी असल्याने उन्हाळ्यात अशा कपड्यांची अधिक मागणी असते.

सध्या टी-शर्टपासून ते महिलांसाठी कुर्तीपर्यंत पारंपारिक तसेच वेस्टन पांढरी पोशाखही विक्रीस येत आहे. उन्हाळ्यात लुंगीचा वापर होत आला आहे. पांढऱ्या कपड्यांना विशेष मागणी होत आहे. महिलांचे पांढरी कुर्ता आणि टॉप अधिक मागणी आहे, तसेच प्लेन पांढऱ्या कपड्यांसह फुलांची डिझाईन असलेले पांढरे कपडेही विक्री होत आहे.

# रसायनीतील जलपातळीत घट

**मोहोपाडा** : रसायनी पाताळगंगेच्या ग्रामीण भागातील जलाशय कोरडे पडत आहेत. त्यामुळे परिसरात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

नदीपात्रातील पाण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने परिसरातील इतर जलाशय कोरडे पडत आहेत. येत्या एप्रिल, मे महिन्यात भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. येथील पाताळगंगा नदीच्या पाण्याच्या पातळीतही घट झाली असून, पाण्याचे प्रमाण कमी होत असल्याने उपाययोजनांची गरज आहे.

## संपादकीय

# उमेदवारीसाठी रस्सीखेच

लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊन जवळपास दोन आठवडे उलटत आले तरीही महाराष्ट्रात भाजपप्रणित महायुती तसेच विरोधकांची महाविकास आघाडी या दोघांचेही संपूर्ण जागावाटप जाहीर न झाल्यामुळे या संदर्भातील सगळ्यांचीच उत्कंठा शिगेला पोहचली आहे. उमेदवार जाहीर करण्यात होत असलेल्या विलंबामुळे दोन्ही बाजूला घटक पक्षांमध्ये कुठल्या जागांवरून वाद आहेत याचे कयास तूर्तास बांधले जात आहेत.

**महाराष्ट्राने गेल्या दोन-अडीच वर्षांत राज्यातील राजकारणाला मोठी कलाटणी देणारे हादरे पाहिले आहेत. आधी शिवसेनेतील बंड आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फूट यामुळे राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला आहे. दोन मोठ्या राजकीय पक्षांमध्ये उभी फूट पडून प्रत्येकी दोन-दोन गट तयार झाल्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेची आणि चुरशीची असणार आहे. यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने उमेदवार जाहीर करण्यात आघाडी घेतल्याचे स्पष्ट दिसते आहे. त्या खालोखाल शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि अजित पवार यांनी काही जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे, परंतु शिंदे गट व राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्याकडून अद्याप उमेदवारांची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. भाजपने देशभरातील उमेदवारांच्या सात याद्या आतापर्यंत जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील २३ उमेदवारांची घोषणा भाजपने मंगळवारपर्यंत केली होती, तर बुधवारी अमरावती मतदारसंघातून नवनीत राणांची उमेदवारी भाजपकडून जाहीर करण्यात आली. महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप जाहीर झालेले नसताना ठाकरे गटाने १७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, तर काँग्रेसने सात जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. घटक पक्षांनी आघाडी धर्माचे पालन करता परस्पर विविध जागांवर उमेदवार घोषित केल्याबद्दल राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून नाराजी व्यक्त करण्यात आल्याचेही समजते. दरम्यान, अनेक वेळा बैठका घेऊन व अनेक प्रस्तावांची चर्चा होऊनही प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने अखेर विरोधकांच्या महाविकास आघाडीसोबत न जाण्याचा निर्णय घेऊन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यासोबत युती जाहीर केली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या या भूमिकेमुळे राज्याच्या राजकारणात आणखी एक नवा ट्विस्ट येताना दिसतो आहे. दरम्यान, जरांगे यांनी निवडणूक लढवण्यासंदर्भातील निर्णय अद्याप जाहीर केलेला नाही. ते ३० मार्चनंतर उमेदवारांबाबत निर्णय घेतील असे सांगण्यात आले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आपली उमेदवारांची पहिली यादी बुधवारी जाहीर केली. आंबेडकर यांच्या या भूमिकेचा भाजपला फायदा होईल असे म्हणत आघाडीच्या नेत्यांनी बुधवारीदेखील त्यांना निर्णयाचा फेरविचार करण्याचे आवाहन केले. दरम्यान, मुंबईतील सहा जागांपैकी चार जागा उद्धव ठाकरे यांनी स्वत:कडे ठेवल्यामुळे आघाडीतील धुसफूस चव्हाट्यावर आली. काँग्रेस पक्षाचे नेते संजय निरूपम हे मुंबई उत्तर पश्चिम म्हणजेच मुंबई वायव्य लोकसभा मतदारसंघातून इच्छुक होते. ठाकरे गटाने अमोल किर्तीकर यांना या मतदारसंघात उमेदवारी जाहीर केल्यामुळे निरूपम यांनी तीव्र संताप व्यक्त करीत उघडपणे बंडाची भूमिका घेतली आहे. उद्धव ठाकरे यांनी कोविड काळातील खिचडीचोर उमेदवार आपल्या डोक्यावर लादला आहे अशी भाषा संजय निरूपम यांनी वापरली. आपण उद्यापर्यंत वाट पाहू; अन्यथा आपल्यासमोर अनेक पर्याय खुले आहेत, असेही निरूपम यांनी सांगून टाकले आहे. एकंदरीत उमेदवारीसाठीची रस्सीखेच घटक पक्षांमध्ये आणखी काही दिवस सुरू राहील असे स्पष्ट दिसते आहे.**

# पत्रकारांच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे सूप वाजले



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य पातळीवरील अधिवेशन पुणे चिंचवड येथे मोठया थाटात पार पडले. रायगड जिल्ह्यातील पत्रकारांची या वेळी लक्षणीय उपस्थिती दिसून आली. युवक पत्रकार संघटक म्हणून राकेश खराडे यांना रायगड जिल्हा उपाध्यक्ष पदावर नियुक्ती जाहीर करून राज्य अध्यक्ष वसंत मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. गेल्या पाच वर्षांपासून रायगडच्या अध्यक्षपदाची सक्रियतेने धुरा सांभाळणारे ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांना दीर्घकाळ अध्यक्षपदासाठी आणि निर्भिड पत्रकारिता राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या अधिवेशनात पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या वेळी अधिवेशनाच्या खुल्या सत्रात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडलेले ठराव उपस्थित पत्रकारांनी मंजूर केले.

राज्यव्यापी अधिवेशनात प्रत्येक ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजार रुपयांची तरतूद करावी आणि तसा आदेश शासनाने द्यावा असा ठराव मांडण्यात आला आणि पारदर्शक कारभारासाठी जिल्हा व तालुका विविध शासकीय समित्यांमध्ये पत्रकारांना सदस्य नियुक्ती द्यावी यासह अनेक ठराव प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडले. ते ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. ग्रामपंचायतींनी वार्षिक आराखड्यात गाव तिथे ग्रंथालय या धोरणानुसार वृत्तपत्र खरेदीसाठी वार्षिक १० हजार रुपयांची तरतूद करावी यासाठी सरकारने आदेश करावा, ज्यामुळे राज्यातील ३० हजार ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वृत्तपत्रांना आर्थिक पाठबळ मिळेल असा अत्यंत महत्त्वपूर्ण ठराव मांडल्यानंतर पत्रकारांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून हात उचलून या ठरावाला समर्थन दिले, तर वेगवेगळ्या खासगी विमा कंपन्यांना केंद्र सरकार पॉलिसी घेतल्यानंतर उत्पन्न घरात सवलत देते. त्यास धोरणानुसार वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या वाचकांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयाची सूट द्यावी यासाठी केंद्र सरकारला राज्य सरकारने प्रस्ताव पाठवावा. अशा ठरावांमुळे पत्रकारांना शासनाला करण्यात आलेल्या ठरावांचे प्रस्ताव हे वाचक चळवळ तसेच पत्रकारांना प्रेरणादायी असल्याचे जाणवले.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

महाराष्ट्र सरकारने आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान (पेन्शन) योजनेत महिना अकरा हजारांहून २० हजार रुपयांची तरतूद केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन करणारा ठराव मांडत पहिल्यांदाच मंजूर करण्यात आला आणि वाढती महागाई लक्षात घेऊन ज्येष्ठ पत्रकारांसाठी आजची तरतूद करण्याचा सरकारने विचार करावा अशी मागणी करण्यात आली. वाढती महागाई, इतर वस्तूंचे वाढलेले दर आणि जीएसटीचा अतिरिक्त बोजा लक्षात घेऊन सरकारने जाहिरातींच्या दरात वाढ करावी. विभाग, जिल्हा आणि गाव पातळीवरील छोटी वृत्तपत्र हे सर्वसामान्य माणसांचा आवाज असल्याने सरकारने या वर्तमानपत्रांना जाहिरातींचा कोटा वाढवून द्यावा. वृत्तपत्रांनी उत्पादन खर्चावर आधारित विक्री किमती वाढवाव्यात यासाठी पत्रकारांनी व्यापक जनजागृती मोहीम हाती घ्यावी. अधिस्विकृती मिळवण्यासाठीच्या जाचक अटी शिथिल कराव्यात. विभागीय, जिल्हास्तरावरील दैनिकांच्या तालुका पातळीवरील पत्रकारांना अधिस्वीकृती देण्यात यावी. जिल्हा आणि तालुकास्तरावर म्हाडा अंतर्गत पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना सुरू करावी. पत्रकारांच्या मुलांना शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाच्या आणि उच्च शिक्षणासाठी परदेशात कोटा आरक्षित करावा. राज्य आणि जिल्हास्तरीय शासकीय समित्यांवर सदस्य म्हणून आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून पत्रकारांना प्राधान्य देत संधी द्यावी. विधान परिषद सदस्यपदी पत्रकार संघटनेमधून प्रतिनिधित्व द्यावे. असे विविध महत्त्वपूर्ण ठराव प्रदेशाध्यक्षांनी मांडले. त्यास सर्व पत्रकार, तालुका, जिल्हा आणि राज्य कार्यकारिणीने मंजुरी दिली.

# ...म्हणून तिथीनुसार करतात शिवजयंती साजरी

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी शासनानुसार शिवजयंती साजरी केली जाते. काही शिवभक्तांकडून तिथीनुसारदेखील शिवजयंती साजरी केली जाते. याबाबत इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच जन्म १९ फेब्रुवारी १६३० साली झाला आहे. त्यावेळेस साल गणना ही हिंदू पद्धतीनुसार सुरू होती. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्म हा फाल्गुन वद्य तृतीया फाल्गुन शके यावेळेस छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. यानुसार काही लोक १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करतात, तर काही मंडळी तिथीनुसार शिवजयंती साजरी करतात. यंदा तिथीनुसार शिवजयंती आज २८ मार्चला आहे. त्यानिमित्त माहिती जाणून घेऊया या लेखातून...

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शासनाकडून एकावेळी साजरी केली जाते, तर काही लोकांकडून तिथीनुसार शिवजयंती साजरी केली जाते. यामागील भावना काय आहे. काही शिवभक्तांची अशी भावना आहे की, ज्या छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केली त्या महाराजांना



वाटत होते की, जरी परकीय सालगणना असल्या तरी देशाची सालगणना सुरू व्हावी. त्यांनी शालिवन शाखेची सुरुवात केली. तिथीला महत्त्व दिले. परकियांची संस्कृती जी येथे लादण्याचा प्रयत्न झाला होता ते नाकारून प्राचीन संस्कृतीचा प्रतिनिधित्व केले तसेच महाराजांनी भाषा शुद्धीदेखील केली. म्हणून आज काही शिवभक्तांकडून शिवजयंती ही तिथीनुसार साजरी केली जाते.

दोन दोन शिवजयंती साजरी करायला कोणताही वाद नाही. शासनाकडून जी शिवजयंती साजरी केली जाते त्यामागे शासनाची भूमिका अशी आहे. ज्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला त्या १९ फेब्रुवारीच्या दिवशी शिवजयंती साजरी केली जाते, कारण तिथीनुसार शिवजयंती साजरी करायला दरवर्षी तारीख ही बदलली जाते. म्हणून शासन तारखेनुसार शिवजयंती साजरी करत असते.



## बदलते तंत्रज्ञान

# तंत्रज्ञानाची किमया! स्पॅम नंबर 'असा' करा ब्लॉक


गेल्या काही महिन्यांत ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रिपोर्टनुसार, अनोळखी लोकांचे कॉल किंवा मेसेज आल्यानंतर हजारो लोकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आता या लोकांनी व्हॉट्सअॅपवरून फसवणूक करायला सुरुवात केली आहे. अनेक सिक्युरिटी फीचर्स असूनही लोक जाळ्यात अडकतात. व्हॉट्सअॅपवर आता आपण कोणत्याही अनोळखी व्यक्तीला थेट नोटिफिकेशनवरून किंवा फोन लॉक असतानाही ब्लॉक करू शकतो. जर कोणी तुम्हाला संशयास्पद मेसेज पाठवत असेल, जसं की कोणीतरी तुम्हाला फसवण्याचा प्रयत्न करत असेल किंवा तुम्हाला खोटी आश्वासनं देऊन आमिष दाखवत असेल, तर तुम्ही त्यांना दोन टॅपनमध्ये लगेचच ब्लॉक करू शकता. नोटीफिकेशन आल्यावर, रिप्लाय बटणाच्या पुढे ब्लॉक बटण असेल. तुम्ही तुमचा फोन लॉक केला असला तरीही, तुम्ही त्या व्यक्तीला थेट नोटिफिकेशनमधूनच ब्लॉक करू शकता.




व्हॉट्सअॅपमध्ये ब्लॉक आणि रिपोर्टचा ऑप्शन आधीच होता. मात्र आता नवीन फीचर आले आहे. याआधी व्हॉट्सअॅप अनोळखी नंबरवरून आलेल्या संशयास्पद मेसेजवर इशारे देत असे, पण त्यांना ब्लॉक करण्यासाठी चॅट ओपन करावे लागत होते. यामुळे समस्या निर्माण झाल्या आणि अनेक वेळा लोक स्पॅम मेसेज ब्लॉक करत नाहीत किंवा चॅट उघडून ते ब्लॉक करायला विसरतात. आता नवीन फीचरमुळे थेट नोटिफिकेशन पाहून स्पॅमर्सना ब्लॉक करता येणार आहे, त्यासाठी फोन ओपन करण्याची गरज नाही.

टू-स्टेप व्हेरिफिकेशन - तुमचं व्हॉट्सअॅप हॅक होण्यापासून वाचवण्यासाठी ६-अंकी पिन एंटर करा. डिसेपियेरिंग ऑप्शन्स - फोटो, व्हिडीओ आणि व्हॉईस नोट 'व्ह्यू वन्स' म्हणजेच एकदाच पाहिले जाईल अशा पद्धतीने पाठवा. गोष्टी आणखी खासगी ठेवायच्या असल्यास डिसेपियेरिंग ऑप्शन्सचा वापर करा. चॅट लॉक - तुम्ही तुमचे महत्त्वाचे चॅट वेगळ्या पासवर्डने लॉक करू शकता. जर कोणी तुमचा फोन पाहिला तरी तो ते चॅट्स पाहू शकणार नाही. अनोळखी कॉलर - अनोळखी नंबरचा त्रास होऊ नये म्हणून ते सायलेंट करा. प्रायव्हसी चेकअप - व्हॉट्सअॅपमध्ये प्रायव्हसी चेकअप नक्की करा. म्हणजे तुम्हाला कळेल की तुमच्यासाठी कोणते फीचर्स योग्य आहेत आणि तुम्ही ती चालू करू शकता.

# नाट्य आणि चित्रपट अभिनेते राजा गोसावी



**निमित्त**

प्रसिद्ध मराठी नाट्य आणि चित्रपट अभिनेते राजाराम शंकर गोसावी यांना मराठी चित्रपटसृष्टीत 'विनोदाचा राजा' म्हणत असत. त्यांचा जन्म २८ मार्च १९२५ रोजी सातारा जिल्ह्यातील सिद्धेश्वर कुरोली (ता. खटाव) येथे झाला. त्यांचे प्राथमिक शालेय शिक्षण झाले होते. मेळे, गाणी, नकला आणि नाटके यांची त्यांना लहानपणापासूनच आवड होती. नाट्यअभिनेते बाळ गोसावी हे राजा गोसावींचे धाकटे बंधू होत.

सुरुवातीला राजा गोसावी गंगाधरपंत लोंढेंच्या राजाराम संगीत नाटक मंडळीत आणि दिग्दर्शक मास्टर विनायक यांच्या प्रफुल्ल पिक्चर्स या चित्रपटनिर्मिती संस्थेत लहानमोठी कामे करत होते. नंतर दामुअण्णा मालवणकरांच्या प्रभाकर नाट्य मंदिरात ते प्रॉम्प्टरचे काम करायला लागले. त्यांच्या भावबंधन या मराठी नाटकामध्ये त्यांना पहिल्यांदा रखवालदाराची भूमिका मिळाली. त्यानंतर या नाटकातील विविध व्यक्तिरेखा साकारण्याची संधी त्यांना मिळाली. पुण्यातील 'भानुविलास' या चित्रपटगृहामध्ये तिकीटखिडकीवर तिकिट विक्रेता म्हणून ते काम करीत होते. १९५२मध्ये दत्ता धर्माधिकारी यांच्या अखेर जमलं या विनोदी चित्रपटामधून राजा गोसावींनी मराठी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले. त्याचवर्षी आलेल्या राजा परांजपे दिग्दर्शित लाखाची गोष्ट या चित्रपटामध्ये त्यांनी राजा परांजपे यांच्या मित्राची व्यक्तिरेखा साकारली. मुलीच्या वडिलांच्या एक लाख रुपये एका महिन्यात खर्च करून दाखवण्याच्या विचित्र अटीमुळे नायकाची आणि त्याच्या मित्राची होणारी तारांबळ यातून या चित्रपटात विनोदनिर्मिती करण्यात आली आहे. अडचणीत असलेल्या जिवलग मित्राला बाहेर काढण्यासाठी केलेली धडपड यात त्यांनी अचूक साकारली. ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेली गीते आणि आशा भोसले आणि सुधीर फडके यांचे पार्श्वगायन असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना आवडला. यातील राजा गोसावींचा सहजसुंदर अभिनय चित्रपटाला पूरक ठरला. हे चित्रपट 'भानुविलास' चित्रपटगृहामध्ये लागले, तेव्हा एक दिवसाकरिता स्वत:च्याच चित्रपटाची तिकिटे त्यांनी विकली होती.

राजा गोसावींनी अनेक चित्रपटांत गंभीर भूमिका सहज रीत्या साकारल्या. राजा गोसावींनी मराठी चित्रपटांमध्ये कारकीर्द गाजवत असताना मराठी रंगभूमीवरही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. उधार उसनवार (भीमराव वाघमारे), एकच प्याला (तळीराम), करायला गेलो एक (हरिभाऊ हर्षे), कवडीचुंबक (पंपूशेट), घरोघरी हीच बोंब (दाजिबा), डार्लिंग डार्लिंग (प्रभाकर), तुझे आहे तुजपाशी (श्याम), नटसम्राट (गणपतराव बेलवलकर), पुण्यप्रभाव (नुपुर, सुदाम, कंकण), प्रेमसंन्यास (गोकुळ), भाऊबंदकी (नाना फडणीस), भावबंधन (रखवालदार, महेश्वर, कामण्णा आणि धुंडीराज), याला जीवन ऐसे नाव (नाथा), लग्नाची बेडी (अवधूत, गोकर्ण), संशय कल्लोळ (फाल्गुनराव, भादव्या) इत्यादी अनेक सामाजिक, विनोदी आणि कौटुंबिक नाटकांमध्ये त्यांनी वेगवेगळ्या छटा असलेल्या भूमिका केल्या.

राजा गोसावी यांचा विवाह १९४९मध्ये झाला. त्यांच्या पत्नीचे नाव सुनंदा असून या दाम्पत्यास दोन मुली व तीन मुलगे आहेत. त्यांच्या मुलांनी लहानपणी हौशी रंगभूमीवर काम केले होते. त्यातील त्यांच्या शमा देशपांडे या कन्या हिंदी चित्रपट आणि मालिकांमध्ये अभिनेत्री म्हणून कार्यरत आहेत.

१९९५ साली अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान राजा गोसावी यांना मिळाला. नाट्यपरिषदेने बालगंधर्व हा पुरस्कार देऊन त्यांच्या अभिनयाचा गौरव केला. राजा गोसावी यांचे पुणे येथे एका नाटकावेळीच हृदयविकाराचा झटका येऊन निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ आणि गौरवार्थ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही संस्था राजा गोसावी बाल नाट्य शिबीराचे आयोजन दरवर्षी करते.

(साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




**उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या रामबागमध्ये सायंकाळी कारंजे आणि रोषणाई पाहण्यासाठी अनेक नागरिक भेट देत असतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# वजन कमी करण्यासाठी मखाणे खाणं फायदेशीर

मखाणे तलावांमध्ये वाढणाऱ्या युरील फॉक्स नावाच्या वनस्पतीपासून मिळतात. मखाणे खाण्याचे फायदे नेहमीच डायटीशियन आपल्याला सांगत असतात. एक हेल्दी स्नॅक्स म्हणून मखाणेकडे पाहिले जाते. खरंतर मखाण्याकडे एक पौष्टिक आहार म्हणूनदेखील पाहिले जाते. मखाण्यामध्ये कोलेस्ट्रॉल, फॅट आणि सोडियमचे प्रमाण कमी असते, याबरोबरच मखाणे वजन कमी करण्यासाठीदेखील मदत करतात, परंतु यासाठी मखाणे योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारे खाणे गरजेचे आहे.



मखाणे हे हाडे आणि दातांसाठी उत्तम असतात. मखाण्यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते, तर पोटॅशियम आणि मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त असते. ब्लड प्रेशरचा त्रास असलेल्या लोकांसाठी हे फायदेशीर आहे. मखाण्यांमुळे मेंदूवरचा तणाव कमी होतो. त्यामुळे मानसिकदृष्ट्या आजारी असणाऱ्या लोकांनाही मखाणे खाणे फायदेशीर आहे.

मखाण्यामधील कॅल्शियम आणि लोह गर्भवती स्त्रियांसाठीदेखील उपयुक्त आहेत. याबरोबरच मखाणे उपवासातही खाल्ले जातात. दररोज एक मुठ मखाणे तुमची त्वचा चमकदार बनवण्यास मदत करतात.

मखाण्यामध्ये कार्बोहायड्रेट्स चांगल्या प्रमाणात असतात. याबरोबरच कोलेस्ट्रॉल, सॅच्युरेटेड फॅट आणि सोडियमचे प्रमाण कमी असते. मखाण्यातील हे पोषक वजन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे ते खाल्ल्यानंतर खूप वेळ भूक लागत नाही.

मखाणे तुम्ही कच्चे किंवा भाजून खाऊ शकता. रात्रभर भिजवलेले मखाणे दूध, सूप किंवा भाज्यांमध्ये घालून खाऊ शकता. तुम्ही मखाण्याची खीर, मखाण्याचा चिवडादेखील बनवू शकता. मखाणे जास्त प्रमाणात खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. गॅस, पोट फुगणे, पोट दुखणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर दररोज ३० ग्रॅम मखाणे खाणे फायदेशीर आहे. या व्यतिरिक्त तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकता.

दरम्यान, तुम्हाला जर तुमचे वजन कमी करायचे असेल, तर तुम्ही तुमच्या आहारात मखाणाचा समावेश करू शकता. मखाणामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते त्यामुळे हाडे मजबूत बनवते. मखाणा रोगप्रतिकारशक्ती वाढवते, रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवते व पचनक्रिया सुधारते.

# मुरुडमध्ये एलईडी मासेमारी करणाऱ्या बोटी ताब्यात

## आठवडाभरातील दुसरी कारवाई

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने एलईडी व पर्ससिन नेट मासेमारी करण्यावर बंदी असतानासुद्धा खोल समुद्रात मासेमारी करीत असताना मुरुड येथील भारतीय तटरक्षक विभागाने अलिबाग कोळीवाड्यातील चार बोटी ताब्यात घेतल्या. ही या आठवड्यातील दुसरी कारवाई आहे.

भारतीय तटरक्षक जवान रोजच्याप्रमाणे समुद्रात आपल्या सुजीत अग्रीम जहाजावरून टेहळणी करीत असताना पहाटेच्या दरम्यान चार बोटी वेगवेगळ्या अंतरावर एलईडीद्वारे मासेमारी करताना निर्दशनास आल्यावर जवानाने बोटींना घेराव घालून बल्लाळेश्वर, सिद्धीविनायक, कुलस्वामिनी व आणखी एक बोट अशा सहा सिलेंडरच्या चार बोटींवरील खलाशांना ताब्यात घेण्यात आले आहे.



याबाबत मत्स्यविकास व परवाना अधिकारी तुषार वाळुंज यांनी सांगितले की, भारतीय तटरक्षक जवानांनी पहाटेच्या दरम्यान एलईडी व पर्ससिननेट मासेमारी करणाऱ्या चार बोटीवरील ३७ खलाशांना पकडले असून त्यांची चौकशी करून महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ व सुधारित अध्यादेश २०२१अंतर्गत कारवाई करणात येणार आहोत.

जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी, सध्या रायगड जिल्ह्यात एलईडी मासेमारी करण्याचा पेव फुटले आहे. मत्स्य विभागाने बोट सापडताच त्या बोटीवर असणारा जनरेटर व एलइडी बल्ब व अन्य साहित्य तेथेच नेस्तनाबूत केले, तरच अशा प्रकाराला आळा बसणार आहे, असे सांगितले.

या चार बोटीत ३७ खलाशी आढळले. त्यापैकी एक १२ वर्षांचा मुलगा असून हे सर्व सुलतानपुरी उत्तरप्रदेशचे रहिवासी आहेत. पकडलेल्या दोन बोटीतून एक टनपेक्षा जास्त मच्छी, २२ एलईडी अंदाजे १८ लाख रुपये, तीन जनरेटर, पर्ससिननेट असे अंदाजे ३० लाख रुपयांचा माल हस्तगत करून मत्स्यविकास व परवाना अधिकाऱ्यांकडे देण्यात आले असल्याचे तटरक्षक अवस्थान मुरूडच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# कापडे बुद्रुकच्या विकासासाठी तरुणांनी पुढे यावे -आमदार दरेकर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

उत्सवांसोबतच आपल्या गावाचा, परिसराचा, पंचक्रोशीचा विकास झाला पाहिजे. यासाठी सगळ्या तरुण पिढीने झोकून काम केले पाहिजे, असे आवाहन भाजप विधान परिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी केले. ते कापडे बुद्रुक गावी साईनाथ मित्र मंडळ कापडे बुद्रुक माळवाडीतर्फे आयोजित केलेल्या साईभंडाराप्रसंगी बोलत होते.



या वेळी मुंबई भाजप उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, भाजपचे स्थानिक नेते प्रसन्ना पालांडे, नारायण साने, हरिश्चंद्र पवार, राजन धुमाळ, निलेश चिकणे, एकनाथ कासुर्डे, महेश निकम, यांसह साईनाथ मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

तालुक्यातील उद्योजकता वाढीसाठी नवीन कारखानदारी सुरू करणाऱ्यांना त्यांच्या प्लांटसाठी आवश्यक तो अर्थपुरवठा करणार, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

आराध्यदैवत श्रीकाळभैरवनाथ देवस्थानच्या सौंदर्यीकरणासाठी दोन महिन्यांपूर्वी ५० लाखांच्या निधीची तरतूद आपण करण्याचा शब्द दिला असून त्याची पूर्तता तातडीने करण्याचे प्रयत्नही केले असल्याचे त्यांनी भैरवनाथनगर सहाणेवर ग्रामदैवतांच्या आगमनानंतर पालखीतील श्रीदेव काळभैरवनाथ, श्रीजोगेश्वरी व श्रीदेव रवळनाथांचे दर्शन घेऊन व्यक्त केले.

# अंबा नदीची पाणीपातळी घटली

## गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला थेट अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. आता आंबा नदीची पाणीपातळी प्रचंड घटली आहे, तसेच जॅकवेलमध्ये तब्बल सहा फूट गाळ साचला आहे. त्यामुळे हा गाळ काढण्यासाठी मंगळवार व बुधवार पालीतील पाणीपुरवठा बंद करण्यात आला. गाळ काढल्यामुळे आता पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.



उन्हाळ्याच्या तोंडावर अंबा नदीची पाणी पातळी घटल्याने पालीकरांना आगामी काळात पाणी पुरवठ्याचा विषय चिंतेचा झाला आहे. नदीच्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. शिवाय नदी पुलाचे काम सुरू असल्याने सिमेंटचे पाणी नदीत जाते. अंबा नदीच्या काठावर अनेक कंपन्या, फार्महाऊस, निवासी संकुल उभे राहिले आहेत. नदीवर महिला धुणीभांडी करतात. या सर्व प्रदूषणामुळे पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमधून थेट अंबा नदीत टाकले जाते. या प्लास्टिकच्या पिशव्या जॅकवेलमध्ये जाऊन साचतात. त्यामुळे पाणीपुरवठा करण्यास अडथळा निर्माण होतो. नगरपंचायत कर्मचारी नियमित जॅकवेलजवळील निर्माल्य व निर्माल्याच्या पिशव्या काढून टाकतात. त्यामुळे याबाबत नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जॅकवेलमधील गाळ काढण्यासाठी दोन दिवस पाणीपुरवठा बंद करण्यात येईल. या प्रकारच्या सूचना नगरपंचायतीमार्फत नागरिकांना देण्यात आल्या आहेत, असे नगरसेवक अशिक मणियार यांनी सांगितले.

# श्रीवर्धन शहरातील कोपरी रस्ता झाला वाहनतळ

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन बाजारपेठ व पेशवे आळी यांना जोडणारा कोपरी रस्ता दादर पुलाजवळ वाहनतळ झाला आहे. या रस्त्याच्या दुतर्फा अनेक दुचाकी उभ्या केलेल्या आढळून येतात, तसेच अनेक रिक्षाचालकदेखील आपल्या रिक्षा या गल्लीमध्ये लावतात. त्यामुळे अनेकदा नागरिकांना ये-जा करण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे.



हा रस्ता हा दुचाकी, सायकलस्वार किंवा पादचाऱ्यांसाठीच असला तरी अनेक जण या रस्त्यावरून रिक्षा, चारचाकी घेऊन जाताना आढळतात. नगर परिषदेने पेशवेआळीकडून सुरू होणाऱ्या रस्त्याजवळ लोखंडी पोल उभे केले होते जेणेकरून फक्त दुचाकीस्वार किंवा पादचारी यांना जाता येईल, परंतु काही समाजकंटकांनी हे पोल मोडून टाकले. नगर परिषदेने याबाबत दंडात्मक कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# विजेच्या लपंडावाने माथेरानकर हैराण

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाने माथेरानकर हैराण झाले आहेत. माथेरानमध्ये सध्या पर्यटन हंगाम सुरू असल्याने पर्यटकांना सेवा देणेही अवघड झाले आहे.

होळी सणानिमित्त माथेरानमध्ये अनेक पर्यटन दाखल झाले होते, परंतु नेमक्या याच काळात वीज खंडित होण्याचे प्रमाणात वाढ झाली यामुळे अनेकांची विजेवर चालणारी उपकरणे नादुरूस्त होत आहेत.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000030880**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-21/2024 - 2025.**<br>RFx E-tender for Providing of service for housekeeping, cleaning, sweeping and Garden Maintenance work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Division Office Panvel for FY 2024-25...**2nd call.**<br>**Tender amount Rs. 23,40,817/-, EMD amount Rs. 23,408/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-चिरनेर, ता-उरण, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|
| **चिरनेर** | श्री. सतिश मधुकर जुवेकर | **२३/३** | ०.८५.०० <br> ०.४०.०० <br> १.२५.०० | **२.२५** |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक: २७/०३/२०२४

**सही/-**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**

पत्ता- शॉप नं. ३ व ४, प्लॉट नं. १२, सेक्टर-५, श्री. हरे कृष्णा सोसायटी, डी मार्ट जवळ, नवीन पनवेल.

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३१/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्रीमती संजिवनी संजय म्हसे**
पत्ता :- वेणगाव रोड, कोकण अळी, मु. दहिवली, घर नं.५/१ पो.अंबिवली, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
**२) श्रीमती नंदा सदानंद थोरवे**
पत्ताः- घर क्र. ४४, मु. उकरुल, पो. चिंचवली, भिवपुरी रोड, ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१
**३) श्रीमती निकीता निशिकांत दांडेकर**
पत्ता :- घर क्र. ४५७, गुरव अळी, मु. दहिवली, पो. अंबिवली, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रुपये ९५,१४७/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ३०/०४/२०२४ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.३० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क** I/C
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १,२ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३३/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. सुदाम नामदेव घोडेचोर**
पत्ता :- रुम नं. १२, ज्ञानेश्वर माऊली को.ऑप.हौ. सोसायटी, उसर्ली रोड, विचुंबे, पनवेल, जि.रायगड ४१०२०६
**२) श्रीमती रुपा जिवन शेट्टी**
पत्ताः- रुम नं.२०२, प्लॉट नं.८/१०,बेल्ले व्ह्यू,रोड नं.२ आय.टी.एम. कॉलेजजवळ, सेक्टर १२, नवीन पनवेल ४१०२०६
**३) श्री. जयेश मनोहर कदम**
पत्ता : घर नं. ४, बी, मु.पो. वावंढळ, ता. पनवेल जि. रायगड ४१० २०६ } **प्रतिवादी**

**दावा रुपये ३,०४,३५९/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ३०/०४/२०२४ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.३० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क** I/C
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ व २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३५/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण**
पत्ता :- एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं.३,रुम नं.१/२ खोपोली, पो. शिळफाटा, ता.खालापूर, जि.रायगड ४१०२०३
**२) श्री. विशाल श्रीपती जाधव**
पत्ताः- सोमजाई वाडी, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
**३) श्री. निलोफर रियाज पठाण**
पत्ता :- एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं.२, रुम नं.४ खोपोली, पो. शिळफाटा, ता.खालापूर, जि.रायगड ४१०२०३ } **प्रतिवादी**

**दावा रुपये १९,२५,९२५/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ३०/०४/२०२४ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.३० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क** I/C
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ व २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३४/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. जतीन संजय म्हसे**
पत्ता :- मु. दहिवली, पो. अंबिवली, घर नं.५/१, वेणगाव रोड, कोकण अळी, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
**२) श्री. प्रमोद प्रकाश कामथे**
पत्ताः- वक्रतुंड सोसायटी, रुम नं.२०३, दुसरा मजला, आकुर्ली रोड, मु.दहिवली, पो.अंबिवली, ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१
**३) श्री. रुपेश यशवंत गरुडे**
पत्ता :- पंचशील नगर, मु.पो. गुंडगे, रेल्वे स्टेशनजवळ, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रुपये ९३,४३६/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ३०/०४/२०२४ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.३० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क** I/C
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३०/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) श्रीमती वैशाली रविंद्र चांदवडकर**
पत्ता :- साईसदन ९, कोकणआळी, साईबाबा मंदिराजवळ, दहिवली, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
**२) श्रीमती मनिषा संतोष यादव**
पत्ताः- स्कायलाईन, रिव्हर साईड, आकुर्ली, फ्लॅट नं. ६०३, ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१
**३) श्रीमती ज्योती दिपक हलपतराव**
पत्ता :- लक्ष्मी नारायण अपार्टमेंट, अे विंग, फ्लॅट नं.३, ब्राम्हण आळी दहिवली, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रुपये ५५,७७४/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ३०/०४/२०२४ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.३० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क** I/C
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# करंजा-रेवस रो रो सेवेची प्रतीक्षा



**सहा महिन्यांपासून काम बंद; नवीन ठेकेदार नेमणार**

**उरण : रामप्रहर वृत्त**

सहा महिन्यांपासून ठेकेदार नसल्याने काम बंद झाले असून करंजा ते रेवस जलमार्गावरील रेवस रो रो जेट्टीच्या कामासाठी नवीन ठेकेदार नेमण्यात येणार आहे, मात्र ही प्रक्रिया लोकसभा निवडणुकीची या आचारसंहिता संपल्यानंतर सुरू केली जाईल. त्यानंतर जेट्टीच्या कामाला पुन्हा सुरुवात होणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

उरण आणि अलिबाग या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या रो रो जलमार्गाचे काम जून २०२४ला पूर्ण करण्यात येणार होते, मात्र ठेकेदाराकडून कामच बंद केल्यामुळे येथील नागरिकांना आणि प्रवाशांना आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे संकेत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने दिले आहेत.

करंजा रो रो जेट्टीचे काम पूर्ण होऊन आठ वर्षे झाली आहेत. उरण व अलिबाग या रायगड जिल्ह्यातील दोन तालुक्यांतील खाडीवर गोव्यातील वाहन वाहतुकीची रो रो पद्धतीची सेवा सुरू करण्यात येणार आहे. या सेवेतील करंजा बंदरातील रो रो जेट्टीचे काम २०१७ साली पूर्ण झाले आहे, मात्र त्याचवेळी अलिबाग येथील रेवस बंदराचे कामही सुरू करण्यात आले होते. आठ वर्षे लोटल्यानंतरही रेवस जेट्टीचे काम अपूर्णच आहे. सध्या या मार्गावरून दोन्ही तालुक्यातील शेकडो प्रवासी प्रवास करीत आहेत. यातील दुचाकी वाहनाने प्रवास करणारे प्रवासी मोठ्या संख्येने आहेत. या मार्गावरून सध्या सुरू असलेल्या प्रवासी बोटीतून धोकादायकरित्या वाहनांचा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गावरील महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडून सुरू करण्यात येणारी रो रो सेवेचे काम धीम्या गतीने सुरू आहे. रेवस जेट्टीच्या कामात अनेकदा अडथळा निर्माण झाला आहे.

### आचारसंहितेनंतर नव्याने निविदा

रेवस जेट्टीचे काम करणारा ठेकेदार काम करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे या कामाची नव्याने निविदा काढण्यात येणार आहे. ही निविदा लोकसभा निवडणुकीनंतर करून नव्याने काम सुरू करण्यात येईल त्याचप्रमाणे कामाचा वाढीव खर्च हा जुन्या ठेकेदाराकडून वसूल करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.

## निवडक

### चिरनेरमध्ये शिवजन्मोत्सव सोहळा

**उरण** : तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा गुरुवारी (दि.२८)साजरा करण्यात येणार आहे. यात सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक सोहळा होईल. त्यानंतर कीर्तनकार हभप प्रकाश पाटील महाराज यांचे कीर्तन होईल. दुपारी १२ वाजता शिवजन्मोत्सव सोहळा पार पडेल. छत्रपती शिवाजी महाराजांचा पाळणागीत सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर सत्यनारायणाची महापूजा आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येईल. रात्री ८ वाजता महाप्रसादाला सुरुवात होईल, या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पनवेल** : परिसरामध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे वय ४५ ते ५०, रंग सावळा, उंची पाच फुट पाच इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, चेहरा उभट, अंगात लाल फुल बाह्यांचा शर्ट व काळसर फुल पॅन्ट असून त्याची खुरटी दाढी व समोरील दोन दात पडलेले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक राजरत्न खैरनार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नवीन पनवेलमधील बंगल्यात घरफोडी

**पनवेल** : नवीन पनवेल येथील एका बंद बंगल्यात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम व परदेशी चलन असा मिळून जवळपास चार लाखांचा ऐवज चोरीस गेल्याची घटना घडली आहे. नवीन पनवेल येथील प्लॉट नं. २२, सेक्टर १२, रोड नं. ११ येथील राजेंद्र डोंगरे यांच्या 'सुनीती' या बंद बंगल्यात अज्ञात चोरट्याने खिडकीचे ग्रील तोडून आत प्रवेश करून घरामध्ये असलेले सोन्या-चांदीचे दागिने, देवाच्या मूर्ती, रोख रक्कम व परदेशी चलन असा एकूण जवळपास चार लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

### लिंबूच्या दरात वाढ

**उरण** : वातावरणातील उष्णता वाढल्याने उन्हाची काहिली आता वाढू लागली आहे. त्यामुळे शरीराला थंडावा देण्यासाठी लिंबू पाणी सर्वात उत्तम पर्याय आहे, मात्र मागील महिन्याच्या तुलनेत सध्या लिंबाचे भाव वाढले आहेत. त्यामुळे सामान्यांना चांगलाच घाम फुटला आहे. सध्या बाजारात १० रुपयांना एक, २० रुपयांना तीन, ५० रुपयांस सहा नग अशा दराने आम्ही विकतो, असे लिंबू विक्रेत्या वर्षा सदानंद देवकर यांनी सांगितले.

## बाजारभावापेक्षा कमी दराने फळांची विक्री दाखवून सेस बुडविणाऱ्यांवर होणार कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या फळ बाजारात बाजारभावापेक्षा कमी दराने फळांची विक्री झाल्याचे दाखवून एपीएमसीचा सेस बुडवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा फळ मार्केटच्या उपसचिव संगिता आढांगळे यांनी दिली आहे. काही व्यापाऱ्यांनी ग्राहकांना बाजार भावानुसार दर न आकारता बिले (देयके) दिल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

सध्या फळ बाजारात आंबा, कलिंगड आदी फळांचा हंगाम चालू आहे. बाजारात मोठ्या प्रमाणात सर्व ठिकाणाहून आंबे येत आहेत. यामध्ये आंब्याच्या विविध प्रकारच्या



जाती असून प्रतवारीनुसार त्यांचे दरही वेगवेगळे आहेत. आंब्याची खरेदी केल्यावर व्यापाऱ्यांकडून खरेदीदारांना बिले दिली जातात. खरेदीदारांना बाजार आवारातून बाहेर पडताना ही बिले दाखवूनच बाजार आवारातून बाहेर पडता येते. या खरेदीवर एक टक्के सेस बाजार समितीला मिळतो, मात्र हा सेस बुडवण्यासाठी अनेक व्यापारी बिलावर कमी दर दाखवून मालाचे बिल बनवून देतात. त्यामुळे बाजार समितीने आता व्यापाऱ्याना सक्त ताकीद दिली आहे.

या संदर्भातील एका परिपत्रकात नमूद केले आहे की, विक्री बिलावर ज्या नावाने आंबा विक्री केला जात आहे त्याचे नाव असले पाहिजे. देवगड, रत्नागिरी, कनार्टक, केसर, पायरी आणि दुसऱ्या इतर जातीचा आंब्याच्या बिलावर स्पष्ट उल्लेख असावा. शेतमालाचे नाव, तसेच बाजारभावानुसार दर दर्शविण्यात यावेत. अनेक बिलांवर बाजार भावानुसार दर दर्शविलेले नसतात. ही बाब गंभीर स्वरूपाची असून बाजार समितीचे कर्मचारी लक्ष ठेवून असून असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

## पनवेल-जेएनपीटी महामार्गावर भुसा भरलेल्या गोणी पडल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तूरडाळीचा भुसा भरलेल्या गोणी रस्त्यावर पडल्याची घटना पनवेल-जेएनपीटी महामार्गावर मंगळवारी घडली. पळस्पेकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या ट्रकमुळे झालेली वाहतूककोंडी वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे दूर झाली.



पळस्पेकडून जेएनपीटीकडे जाणारा ट्रक (आरजे ११ जेबी ८१८२) मध्ये तुरडाळीचा भुसा भरलेल्या गोणी होत्या. त्यातील काही गोणी रस्त्यावर पडल्याने काही काळासाठी या महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. याबाबतची माहिती वाहतूक शाखेला मिळताच पोलीस हवालदार भोईर, पोलीस नाईक पाटील, पोलीस नाईक ढेंबरे, पोलीस शिपाई भोरे, पोलीस शिपाई घोडे आदींचे पथक घटनास्थळी त्वरित पोहचले व त्यांनी ट्रक तसेच, रस्त्यावर पडलेल्या गोणी एका बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात प्रभाग १८ येथील मतदार याद्यांचे वाचन मंगळवारी करण्यात आले. प्रभागातील सर्व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी रोज संध्याकाळी कार्यालयात येऊन आपापल्या याद्या वाचून घ्याव्यात, असे आवाहन प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई यांनी केले आहे.**

## वाशीत विठूनामाच्या गजरात दिंडी सोहळा

### श्रीगुरू पादुका दर्शन उत्सवात गुरुसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीच्या सिडको एक्झिबिशन सेंटर येथे विठूनामाच्या जयघोषात वारकऱ्यांची दिंडी मिरवणूक काढण्यात आली, तसेच ओंकार जप, अभिभाषण, अग्निहोत्र, संगीत मैफल असा भव्यदिव्य आध्यात्मिक कार्यक्रम बुधवारी (दि.२७) पार पडला.

महाराष्ट्र, पंजाब येथील १८ श्रीगुरूंच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली होती. शुक्रवारीही भाविकांना या पादुकांचे मनोभावे दर्शन घेता येणार आहे. पहाटे या पादुकांचे पूजन व काकड आरती करण्यात आली. त्यानंतर या पादुका वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे भावपूर्ण वातावरणात आणण्यात आल्या. विठुनामाचा जयघोष, ढोलताशांच्या गजरात या श्रीगुरू पादुकांचे स्वागत करण्यात आले.

हातात फुलांच्या पाकळ्या घेऊन श्रद्धेने श्रीगुरू पादुकांचे दर्शन भाविकांनी घेतले. दर्शनानंतर भाविकांनी चिंतन, मनन या भागातील ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग, कर्म आणि सेवा मार्ग तसेच लक्ष्मी मार्ग



येथील स्टॉलना भेट देऊन श्री फॅमिली गाईड प्रोग्रॅमबाबत माहिती घेतली. त्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

त्यानंतर रिंगण सोहळा, सायंकाळी श्री फॅमिली गाईड प्रोग्रॅमच्या चीफ क्युरेटर स्टेफिनी फाईट यांचे प्रास्ताविक, आयुर्वेद संतुलनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील तांबे यांचे ओंकार जप, डॉ. पुरुषोत्तम राजिमवाले यांचे अग्निहोत्र, धुनी प्रज्वलन, सकाळ माध्यम समूहाचे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांचे अभिभाषण, आध्यात्मिक गुरू श्री एम. यांचे व्याख्यान आणि रात्री हरिहरन यांचा सांगीतिक कार्यक्रम पार पडला.

## रसाळ, गारेगार कलिंगड बाजारात दाखल



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उन्हाळा सुरू होताच एपीएमसीसह सर्वच फळ बाजारात, रस्त्यांच्या कडेला थंडगार, रसाळ फळांच्या हंगामाला सुरुवात होत असते. सध्या बाजारात लाल रंगाचे रसरशीत कलिंगड, टरबूज दाखल झाले असून, ग्राहकांची सर्वाधिक मागणी आहे.

उन्हाळा सुरू झाला असून, नागरिक रसाळ व थंडगार पेयाला पसंती देत असतात. त्यामुळे रस पेयाची मागणीदेखील वाढत आहे. शरीराला थंडावा देणारे कलिंगड बाजारात मुबलक उपलब्ध झाले असून, त्यांना ग्राहक पसंती देत आहेत. उन्हाळ्याची चाहूल लागताच आंब्यापाठोपाठ मार्च महिन्यापासून फळबाजारात, रस्त्यांच्या कडेला कलिंगड विक्री जोमात सुरू आहे. उन्हाळ्यात जीव पाणी-पाणी करीत असल्याने, नागरिकांची पावले आता आपोआप कलिंगडाच्या दुकानांकडे वळत आहेत. नवी मुंबईतील एपीएमसी बाजारात सद्यस्थितीत १८० ते २०० गाड्यांची आवक प्रतिदिन होत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### या ठिकाणांहून होते आवक

*महाराष्ट्रासह तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून आवक होते. सोलापूर, सांगली, अक्कलकोट, गुलबर्गा या ठिकाणाहून येणाऱ्या कलिंगडांना सर्वाधिक मागणी सध्या सुरू आहे. यामध्ये बेबी आणि नामधारी या प्रजातीच्या कलिंगडची आवक मोठ्या प्रमाणात सुरू असून, यामध्ये शुगरबेबीला अधिक मागणी असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. उन्हाळ्यात रस पेयाबरोबर फ्रुट सलाडलादेखील अधिक मागणी असते.*

## हवाई दलाच्या निषिद्ध परिसरात प्रवेश; गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय हवाई दलाच्या शेवा गावाजवळील विमान विरोधी क्षेपणास्त्र केंद्रातील (अ‍ॅण्टी एअरक्राफ्ट मिशाईल स्टेशन) प्रतिबंधित परिसरातील तांत्रिक क्षेत्रात संशयितरित्या फिरणाऱ्या एका कर्मचाऱ्यावर हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी पहाटे न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. संशयित व्यक्तीचे नाव तोरिकुल नूहू शेख असे आहे.

तोरीकुल हा नवी मुंबईतील इंदीरानगर झोपडपट्टीत राहण्यास होता. तोरीकुल हा मुळ राहणारा झारखंड राज्यातील साहेबगंज जिल्ह्यातील आहे. रविवारी चौकशीनंतर तोरीकुल याला अटक करण्यात आली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी तोरीकुल याची २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत चौकशी करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत.

## सीवूड्समध्ये ३८ सोसायट्यांचा एकत्र होलिकोत्सव

### पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी स्तुत्य उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

अनेकदा झाडांची कत्तल करून होळी साजरी केली जात असल्याचे आढळून येते. त्यावर अनेकदा टीका होऊन सणांबाबत गैरसमज निर्माण होतात, मात्र समाजमाध्यमांवर होणाऱ्या सततच्या आवाहनाचा फायदा पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी होऊ शकतो हे सिवूडमधील काही सोसायट्यांनी आपल्या कृतींतून दाखवून दिले आहे. सीवूड्स रेसिडन्ट वेल्फेअर आसोसिएशनच्या माध्यमातून ३८ सोसायट्यांनी पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी एकत्र येत होळी साजरी करीत अनेकांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

सदस्यांनी परिसरातून नको असलेल्या लाकडी फळ्या आणून ही होळी साजरी केली गेली.



सीवूड्स रेसिडन्ट वेल्फेअर असोसिएशन अंतर्गत जवळपास ३८ सोसायट्यांनी एकत्र येत गणेश मंदिर मैदानात सार्वजनिक होळी साजरी केली. मुख्य म्हणजे एकही झाड न तोडता संस्थेने घरात जमा झालेली नको असलेली लाकडे देण्याचे आवाहन केले होते. यानुसार प्रत्येक सोसायटीत टेम्पो फिरवला गेला त्यातून अनेक लाकडे जमा झाली. त्यापासून होळी सजवून त्यास अग्नी देण्यात आला.

### पालापाचोळा, गोवऱ्यांचा वापर

होलिकोत्सव साजरा करताना कोणतेही झाड न तोडता इमारतींमध्ये झाडांची पडलेला पालापाचोळा, झाडांच्या वाळलेल्या फांद्या वापरल्या जातात. ३५ सोसायट्यांमधून भरपूर सुका पालापाचोळा जमा होतो. त्यासह यंदा समाजमाध्यमांवरून वापरण्यात येणारे शेणाच्या गोवऱ्या वापरण्याचे आवाहन वाचून गोवऱ्यांचा वापर यंदा करण्यात आला.

# खासदार सुनील तटकरेंच्या विजयासाठी साईबाबांना साकडे

## ■ राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतले शिर्डी येथे दर्शन

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे यांना रायगड लोकसभेची उमेदवारी दिल्याची घोषणा राष्ट्रवादीचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी केली. तटकरे यांना पुन्हा खासदार करण्यासाठी नागोठणे विभागातील कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. मेहनतीसोबत भगवंताचे आशीर्वाददेखील पाहिजे यासाठी नागोठणे विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके व डॉ. राजेंद्र धात्रक यांनी शिर्डी येथे जाऊन साईबाबांचे दर्शन घेत खासदार तटकरे यांना निवडून आणण्यासाठी साकडे घातले.

रोहा पंचायत समितीचे माजी सदस्य रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक यांचा २३ मार्च रोजी वाढदिवस होता. वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. धात्रक, राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोहा तालुका उपाध्यक्ष रिचा धात्रक, डॉ. धात्रक यांची मुलगी डॉ. स्वप्नाली मेघराज घोळंबे, जावई मेघराज घोळंबे, व्याही एसटी महामंडळाचे निवृत्त जिल्हा नियंत्रक चंद्रसेन घोळंबे, विहीण रंजना घोळंबे, नातू रयान, भाचा जतीन घुगे यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष अॅड. महेश पवार यांनी दुपारी १२ वाजता शिर्डी येथे साईबाबांच्या मंदिरात आरतीचा लाभ घेतला व विधीवत पूजाअर्चा केल्यानंतर जनसामान्यांच्या विकासासाठी खासदार सुनील तटकरे यांना पुन्हा संधी मिळावी व त्यांचा लोकसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजय व्हावा यासाठी साईबाबांना साकडे घातले. त्यानुसार खासदार तटकरे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे.

### महायुतीचा धर्म पाळणे हे आद्य कर्तव्य –किशोर म्हात्रे

*दरम्यान, भारताचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये जनसामान्यांचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविलेले आहेत. तिसऱ्यांदा देशाचे सक्षम पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनीच नेतृत्व करावे यासाठी मोदीजींचा ४०० पार करण्यासाठी आम्ही कार्यकर्ते अग्रेसर आहोत. भाजप महायुतीने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी रायगड जिल्ह्यातील भाजपचे कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेतील आणि नवा इतिहास घडविण्यासाठी रायगडचा खासदार निवडून देणार आहोत. महायुतीकडून दिलेला उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी आमची असून महायुतीचा धर्म पाळणे हे आमचे आद्य कर्तव्य असल्याचे भाजपचे माजी रायगड जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.*



# अलिबाग तालुक्यातील उमटे धरणाच्या पाणीपातळीत घट



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील पाणीपातळी मार्च महिन्यातच खालावली आहे. त्यामुळे आतापासूनच नियोजन करण्यास पाणीपुरवठा विभागाने सुरुवात केली आहे. या धरणातून आता नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

अलिबाग तालुक्यात उमटे येथे १९८०मध्ये धरण उभारण्यात आले. या धरणातून परिसरातील ६० ते ७० गावांना पाणीपुरवठा केला जातो. या धरणावर कोट्यवधी रुपये खर्च झाले असून ४० वर्षांनंतर धरणाची अवस्था बिकट झाली आहे. धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला होता. नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही त्याकडे जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्ष झाले होते. नागरिकांच्या रेट्यानंतर चार वर्षांपूर्वी धरणातील गाळ काढण्यात आला होता. या धरणावरून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्याने पाण्याच्या प्रवासातील गळती थांबली असली तरी चोराटी नळजोडण्यांना आळा घालण्यात जिल्हा परिषद प्रशासन अपयशी ठरले आहे.

सध्या या धरणातील पाणीपातळी कमी झाली आहे. अर्ध्याहून अधिक अलिबाग तालुक्याला या धरणातून पाणी पुरवले जाते. हे पाणी पुरेसे नाही. त्याला पर्याय म्हणून त्याच परिसरात सांबरकुंड धरण बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. या धरणाचे काम सुरू होऊन ते पूर्ण व्हायला आणखी काही वर्षे लागतील. तोवर नागरिकांना उमटे धरण हा एकमेव पर्याय आहे.

मे अखेरपर्यंत हे पाणी पुरवणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन पाणीपुरवठा विभागाने सध्या एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना कळविण्यात आले आहे, मात्र यामुळे नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे.

**उमटे धरणातील पाणीपातळी कमी झाली आहे. त्यामुळे नागरिकांना दिवसाआड पाणी पुरवले जात आहे. मे अखेरपर्यंत पाणी पुरवायचे असल्याने हे नियोजन केले आहे. नागरिकांनी यासाठी सहकार्य करावे आणि पाण्याचा वापर जपून करावा.**
**–संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, रायगड जि.प.**

# अनुज्ञप्ती चाचणी, नवीन वाहन नोंदणी, जुन्या वाहनांच्या पुनर्नोंदणीचे कामकाज जिते येथे होणार सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास जिते येथील गट नं.२८/१ या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शासकीय जागेत रस्ता सुरक्षा हॉल व कार्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून २३ मार्च रोजी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्या हस्ते या इमारतीचा उद्घाटन सोहळा झाला. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची मुख्यालय जुनी इमारत विकासस्मृती व पेण–खोपोली बायपास रोड येथे सुरू असलेले कामकाज टप्प्याटप्प्याने जिते येथे हलविण्यात येणार आहे.

पेण–खोपोली बायपास रोड येथे करण्यात येणारी अनुज्ञप्ती चाचणी, नवीन वाहन नोंदणी, जुन्या वाहनांची पुनर्नोंदणी इत्यादी सर्व प्रकारचे कामकाज १ एप्रिलपासून जिते येथील नवीन कार्यालयाच्या इमारतीच्या आवारात करण्यात येणार आहे तसेच विकासस्मृती या इमारतीमध्ये सुरू असलेले कामकाज टप्प्याटप्प्याने जिते येथील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात येणार आहे. सर्व वाहन मालक, चालक तसेच नागरिकांना या बदलाबाबत अवगत करण्यात येत असून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जिते येथील नवीन इमारतीत सर्व कामकाज सुरळीत होईपर्यंत सहकार्य करावे, असे आवाहन पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# कर्जतमधील आदिवासींचे घरकुल योजनेसाठी निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात असलेल्या भिसेगाव आदिवासीवाडीतील महिलांनी घरकुल शबरी योजनेचा लाभ द्यावा, अशा मागणीचे निवेदन नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना दिले आहे. त्याचप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांना भेटून त्यांनादेखील निवेदन देण्यात आले.

भिसेगाव येथील आदिवासीवाडी सुमारे चाळीस वर्षांपासून अस्तित्वात आहे. त्या वाडीत अनेक पिढ्यांचे लोक राहत आले आहेत, मात्र त्यांना राहण्यासाठी हक्काचे घर नाही. त्यामुळे त्यांना कुडामातीच्या घरात, झोपडीत ऊनपावसाच्या माऱ्यात जीवन जगावे लागत आहे.

सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांच्या सहकार्याने त्यांनी प्रशासनाचे दार ठोठावले आहे. याबाबतचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. या आदिवासींसाठी शबरी आदिवासी घरकुल योजनेची अंमलबजावणी करून हक्काचे घर मिळवून द्यावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली. निवेदन देतेवेळी माजी नगरसेवक संकेत भासे उपस्थित होते.

**आदिवासी वाडीसाठीची घरकुल योजना म्हणजेच शबरी योजनेचा लाभ भिसेगाव आदिवासीवाडीतील लोकांना लवकर मिळवून देऊ तसेच वाढीव घरपट्टीबाबत विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.**
**–वैभव गारवे,**
**मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद**



# नोंदणी, मुद्रांक कार्यालये सुट्टीच्या दिवशी राहणार सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नोंदणी व मुद्रांक विभागाची रायगड जिल्ह्यातील सर्व नोंदणी कार्यालये मार्च अखेरच्या २९ मार्च, ३० मार्च व ३१ मार्च या सुट्टीच्या दिवशी सुरु ठेवण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या सूचना आहेत, असे मुद्रांक जिल्हाधिकारी श्रीकांत सोनवणे यांनी कळविले आहे.

१ एप्रिलपासून नवीन (सुधारित) बाजारमूल्य दर तक्ते लागू होत असतात. त्यामुळे दस्त नोंदणीची वाढती संख्या विचारात घेता होणारी गर्दी टाळण्यासाठी सुट्टीच्या दिवशीही रायगड जिल्ह्यातील सर्व कार्यालये सुरू ठेवण्यात येणार आहेत. याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे मुद्रांक जिल्हाधिकारी श्रीकांत सोनवणे यांनी एका वृत्तान्वये कळविले आहे.

# सर्व मतदान केंद्रांची पाहणी करण्याचे जिल्हाधिकारी जावळे यांचे निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाची केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. या मूलभूत सुविधांची पाहणी आणि तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

रायगड जिल्हा हा ३२ रायगड आणि ३३ मावळ अशा दोन लोकसभा मतदारसंघांत विभागला आहे. जिल्ह्यातील सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधित यंत्रणाच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी जावळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात



आयोजित बैठकीत घेतला. त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, मूलभूत सुविधा पुरविणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. सर्व अधिकाऱ्यांनी स्वत: मतदान केंद्राना भेट देऊन पाहणी करून मुलभूत सुविधांच्या उपलब्धतेची खात्री करावी. आवश्यकतेनुसार डागडुजी, दुरुस्ती करावी. सर्व मतदान केंद्रांवर प्रकाश, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, रॅम्प आदींची व्यवस्था करण्यात यावी.

वेब कास्टिंगसाठी निवडलेल्या मतदान केंद्रांवर आवश्यक अटींची खात्री करावी. ज्या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदार मतदान करणार आहेत तेथे व्हीलचेअर व स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात यावी. आयोगाच्या सूचनानुसार आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जावळे यांनी या वेळी दिल्या.

जिल्ह्यातील जी मतदान केंद्र आदर्श मतदान केंद्र बनवली जातील, ती स्थानिक साहित्याने सुसज्ज असावीत. कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील किमान ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग, सीसीटीव्ही किंवा व्हिडिओग्राफीसाठी पुरेशी व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या तसेच मतदान केंद्रावर पोहचण्यास मतदारास त्रास होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी. मतदानाचा दिनांक लक्षात घेता सावलीची व्यवस्था तसेच रांगेचे नियोजन करावे. सर्व मतदार केंद्रांवर प्रथमोपचार सुविधा बरोबरच एक आरोग्य कर्मचारी अधिकारी नियुक्त करण्यात यावा. आवश्यक ती सर्व औषधे मतदान केंद्रावर ठेवण्यात यावीत, असेही त्यांनी सूचित केले.

# दिव्यांग विद्यार्थी कल्याण निधीसाठी संगीतमय कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

आई डे केअर संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थी कल्याण कार्याच्या मदतीसाठी दर्जेदार संगीत संध्या ऋतू हिरवा माय मराठीचे अभिजात लेणे–कवियत्री शांताबाई शेळके यांच्या निवडक कविता, भावमधुर गीते समर्पक नृत्याच्या साजासह पेणच्या कलावंतांतर्फे ७ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे सादर करण्यात येणार आहे. आई डे केअर संस्थेचे पाठीराखे अॅड. मंगेश नेने आणि अनेक मान्यवर हितचिंतकांचा भक्कम आधार या उपक्रमाला लाभला आहे.

आई डे केअर संस्था सन २०१०पासून दिव्यांगांसाठी (गतिमंद प्रवर्ग) निवासी व्यवसाय शिक्षण–प्रशिक्षण केंद्र पेण रामवाडी येथे चालवत आहे. बहुसंख्य दिव्यांग विद्यार्थी पेण तालुक्यातील आसपासच्या खेड्यातील असून अतिशय गरीब घरातले आहेत. संस्थेचे शिक्षण आणि वाहतूक शुल्क, शैक्षणिक साहित्य, गणवेश याचा खर्च करण्यास अनेक पालक सक्षम नाहीत. कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसूनही त्यांना उत्तम शिक्षक, काळजीवाहक, आधुनिक थेरपी, दर्जेदार शैक्षणिक साधने हितचिंतकांच्या सढळ मदतीच्या बळावर संस्था पुरविते. ६० विद्यार्थी, २१ कर्मचारी आणि शाळा चालविण्याचे अन्य खर्च याची तजवीज करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची प्रेरणा पेण येथील दर्दी संगीतरसिक विनायक गोखले यांची आणि संकल्पना, निर्मिती व संगीत संयोजन नंदा गोखले यांचे आहे. कार्यक्रमाची संहिता स्नेहल सुनील तुपे यांनी लिहिली असून निवेदन वेदिका मोडक करणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. शिल्पा संजय ठाकूर यांनी केले आहे.

# माणगाव-म्हसळा मार्गावर दोन वाहनांचा अपघात; एक जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव–म्हसळा रस्त्यावर नळेफोडी गावाजवळ एका कारची दुसऱ्या वाहनाला धडक लागून झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला आहे. या अपघाताची फिर्याद अब्दुलकैश अजहर आलम (वय ४४, रा. नवेनगर, ता. म्हसळा) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अक्षय प्रतापराव चरणकर (रा. पुणे) यांनी त्याच्या ताब्यातील होंडा कार (एमएच १४–केडब्ल्यू १४६४) ही म्हसळा बाजूकडून माणगाव बाजूकडे चालवत घेऊन येत होते. नळफोडी गावाजवळ चरणकर यांनी त्याच्या तब्यतील कार अतिवेगाने चालवून माणगाव बाजूकडून म्हसळा बाजूकडे जाणाऱ्या इंजॉय एलटी सात सीटर बीएसआयव्ही गाडीला (एमएच ०४–जीइ ६४५२) समोरून धडक दिली. या अपघातात अजहर आलम शेख (वय ३८, रा. म्हसळा) हे गंभीर जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.

या अपघातप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक भजकर करीत आहेत.

# माथेरानमध्ये झाड कोसळले



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान रेल्वेस्थानकाजवळ असलेल्या घावरे हॉटेल आणि घावरे दूध डेअरीच्या कंपाउंडमधील जवळपास दोनशे वर्षे जुने असणारे नांदरूक जातीचे अवाढव्य झाड मंगळवारी (दि.२६) सायंकाळी कोसळले. सुदैवाने या वेळी मुख्य रस्त्यावरून पादचाऱ्यांची वर्दळ नसल्याने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नसली तरी हॉटेल आणि डेअरीच्या कंपाउंडमधील टेबल, खुर्च्या व पत्र्याचे शेड पूर्णपणे पडली आहे.

यामध्ये पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, असे हॉटेलचे व्यवस्थापक शकील पटेल यांनी सांगितले. दरम्यान, घटनास्थळी वनसमितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांनी धाव घेऊन घडलेल्या वस्तुस्थितीचा पंचनामा करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. नगर परिषदेच्या कामगारांमार्फत हे झाड बाजूला काढण्यात आले आहे.

# चेन्नईचा गुजरातवर एकतर्फी विजय

## सांघिक कामगिरी; शिवम दुबेचे अर्धशतक



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने गुजरात टायटन्सवर ६३ धावांनी एकतर्फी विजय मिळवला. गुजरातने नाणेफेक गमावत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण तो काही फायदेशीर ठरला नाही. चेन्नईने सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेत धावांचा पाऊस पाडला. सीएसकेच्या प्रत्येक फलंदाजाने धावफलकात आपले योगदान दिले आणि संघाची धावसंख्या २०६वर नेऊन ठेवली. गोलंदाजीतही चेन्नईने आपली चमक दाखवत गुजरातच्या फलंदाजांना टिकू दिले नाही.

गुजरातच टायटन्सचे फलंदाज या सामन्यात अयशस्वी ठरले. साई सुदर्शन वगळता एकाही फलंदाजाला ३०चा आकडाही गाठता आला नाही. सुदर्शनने ३१ चेंडूंत तीन चौकारांच्या मदतीने ३७ धावा केल्या. संघाचे दोन्ही सलामीवीर शुबमन गिल (८) आणि रिध्दिमान साहा (२१) हे मोठी खेळी करू शकले नाही. त्यानंतर मिचेलच्या गोलंदाजीवर धोनीने झेप घेत एक जबरदस्त झेल पकडला आणि विजय शंकरला (१२) बाद केले.

डेव्हिड मिलरही मोठी कामगिरी करू शकला नाही आणि तो २१ धावा करीत बाद झाला. धोनीनंतर रहाणेनेसुद्धा एक कमाल झेल टिपला, तर ओमरजाईदेखील ११ धावांवर खेळत असताना देशपांडेकडून झेलबाद झाला. यानंतर राहुल तेवतिया (६) आणि राशीद खान (१) यांना मुस्तफिझूर रहमाननेबाद केले. उमेश यादवने एक षटकार लगावत १० धावा केल्या, तर जॉन्सने पाच धावा केल्या. एकंदरीतच गुजरातचे फलंदाज अपयशी ठरल्याने संघाला तब्बल ६३ धावांनी पराभव पत्करावा लागला.

तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला, पण चेन्नईच्या फलंदाजांच्या फटकेबाजीला आळा घालण्यात ते अयशस्वी ठरले. सलामीवीर रचिन रवींद्रने २० चेंडूंत तीन षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने ४६ धावा केल्या. अवघ्या ४ धावांनी त्याचे पहिले अर्धशतक हुकले. त्यानंतर ऋतुराजने फटकेबाजी सुरू केली. त्याने पाच चौकार आणि एका षटकारासह ४६ धावा केल्या. अजिंक्य रहाणे मात्र १२ धावा करीत स्वस्तात बाद झाला. तो बाद झाला तरी संघाच्या धावांना ब्रेक नाही लागला.

रहाणेनंतर आलेल्या शिवम दुबेने पहिल्या चेंडूपासून आक्रमक पवित्रा घेतला. दुबेने २३ चेंडूंत पाच षटकार आणि दोन चौकारांसह ५१ धावा केल्या. त्याच्या या कामगिरीसाठी त्याला सामनावीर घोषित करण्यात आले. डॅरिल मिचेल २४ धावा करीत नाबाद राहिला, पण या सगळ्यांसोबतच पहिला आयपीएल सामना खेळणारा समीर रिझवीने षटकाराने आपले खाते उघडले. सहा चेंडूंत दोन षटकारांसह १४ धावा करून तो बाद झाला, तर रवींद्र जडेजा सात धावा करीत धावबाद झाला.

गुजरातकडून राशीद खानने दोन गडी बाद केले. साई किशोर, स्पेन्सर जॉन्सन आणि मोहित शर्माने प्रत्येकी एक विकेट घेतली, तर आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवणाऱ्या चेन्नईकडून दीपक चाहर, तुषार देशपांडे व मुस्ताफिजूर रहमानने यांनी दोन विकेट्स घेतल्या. मिचेल व पाथिरानाला एक गडी बाद करण्यात यश आले.

# वाडगाव संघ बीपीएलचा विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदू भंडारी सेवाभावी संस्था पुरस्कृत भंडारी समजाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग तालुकास्तरीय भंडारी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत संस्कृत इलेव्हन वाडगाव संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून रेवदंडा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रफुल्ल मोरे, शिवप्रसाद तोडणकर, अविनाश आचरेकर, डॉ. प्रणाली पाटील, कांचन नार्वेकर, माजी नगरसेविका संजना कीर, कित्ते भंडारी ऐक्यवर्धक मंडळ दादर मुंबई कमिटीचे डॉ. दीपक खोत, सुरेश खोत, संदीप खोत, प्रशांत जाधव, भूषण बिर्जे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर उपस्थित होते.

स्पर्धेत स्व. बाबू शिळदणकर इलेव्हन सासवणे संघ उपविजेता ठरला. जय हनुमान कातळपाडा संघाने तृतीय क्रमांक मिळवला. आकाश तवसाळकर याला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष तुकाराम तोडणकर, उपाध्यक्ष सचिन खोत, सचिव रोहन खोत, खजिनदार विनोद टेंबुळकर, सल्लागार राजेश शिंदे, सदस्य सुजित शिळदणकर, स्वेतेश तोडणकर, यतीन राऊत, अमोल मोरे, कामेश पवार, राकेश शिंदे, रवी जाधव, प्रसाद नागवेकर, प्रशांत चिंबूलकर, साहिल पाटील, संतोष कनगुटकर, भूषण बिर्जे, संदेश खोत, प्रणाली पाटील, कांचन नार्वेकर आदींनी परिश्रम घेतले.

# गुजरात टायटन्सला पराभवानंतर आणखी एक धक्का

### स्लो ओव्हर रेटसाठी कर्णधार शुबमन गिलला दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलची विजयाने सुरुवात करणाऱ्या गुजरात टायटन्सला दुसऱ्या साखळी सामन्यात चेन्नई सुपर किंग्जकडून ६३ धावांनी मोठा पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर संघाचा कर्णधार शुबमन गिलला आणखी एक धक्का बसला आहे. सामन्यात स्लो ओव्हर रेटमुळे गिलला १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. यासह तो यंदाच्या आयपीएलमध्ये स्लो ओव्हर रेटसाठी दंड बसणारा पहिला कर्णधार बनला आहे.

चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नईविरुद्धच्या सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळल्यानंतर गुजरातचा कर्णधार शुबमन गिलला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलने जारी केलेल्या एका निवेदनात सांगितले की, गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिलला चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर २६ मार्च रोजी चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सामन्यादरम्यान स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला आहे. गिलला स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळल्यानंतर आचारसंहितेअंतर्गत हंगामाच्या पहिल्या गुन्ह्यासाठी १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

चेन्नईविरुद्धच्या सामन्यात शुबमन गिलला स्लो ओव्हर रेटची शिक्षा झाली होती. प्रत्यक्षात एक षटक उशिरा टाकल्याने शेवटच्या षटकात ३० यार्ड सर्कलच्या बाहेर फक्त चार खेळाडूंना परवानगी होती. जर त्याने षटके वेळेत पूर्ण केली असती, तर तो पाच खेळाडूंना सर्कलच्या बाहेर ठेवू शकला असता, मात्र एक खेळाडू कमी असल्याने त्यांना फारसे नुकसान झाले नाही, कारण मोहित शर्माच्या या षटकात केवळ आठ धावा गेल्या.

अशी आहे दंडाची तरतूद

सध्या शुबमन गिलला फक्त दंड ठोठावण्यात आला आहे, मात्र आगामी सामन्यांमध्ये तो पुन्हा स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळला तर त्याच्यावर एका सामन्याची बंदीही लागू शकते. खरेतर यात दुसऱ्यांदा दोषी आढळल्यास गिलला ३० लाख रुपये आणि संघातील उर्वरित खेळाडूंना सहा लाख रुपये किंवा सामन्याच्या २५ टक्के (जे जास्त असेल) दंड ठोठावला जाईल. तिसऱ्यांदा असे घडल्यास ३० लाख रुपयांचा दंड आणि एका सामन्याची बंदी घालण्यात येईल तसेच उर्वरित खेळाडूंना प्रत्येकी १२ लाख रुपये किंवा मॅच फीच्या ५० टक्के (जे जास्त असेल) दंड ठोठावला जाईल.

# किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने ३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता बुधवारी (दि.२७) आपला संघ जाहीर केला. नाशिक शहरच्या बिंदिसा सोनारकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली, तर सांगलीची श्रावणी भोसले उपसंघनायक आहे. यंदा अंतिम विजयी ठरलेल्या जालन्याच्या तीन मुलींचा या संघात समावेश करण्यात आला आहे.

पटणा (बिहार) येथील पाटलीपुत्र क्रीडा संकुलात ३१ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत ही स्पर्धा होईल. पुणे येथे नुकत्याच झालेल्या किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून ४० जणींची किशोरी गटाच्या सराव शिबिराकरिता निवड करण्यात आली होती. त्यांचा सराव शिबिर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने अहमदनगर जिल्हा हौशी कबड्डी संघटनेच्या सहकार्याने त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या यजमानपदाखाली नेवासा येथे घेण्यात आले. या ४० जणींमधून स्पर्धेकरिता १२ जणांचा संघ निवडण्यात आला.



सराव शिबिर यशस्वी करण्याकरिता त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष साहेबराव घाडगे-पाटील, प्राचार्य सोपानराव काळे, प्रसिद्ध उद्योजक संभाजी काळे यांनी अथक परिश्रम घेतले. निवडण्यात आलेला संघ गुरुवारी (दि.२८) दुपारी १२.१५ वाजता मुंबईच्या लोकमान्य टिळक टर्मिनस येथून समस्तीपूर सुपरफास्ट एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना होईल.

### नाशिकच्या बिंदिसा सोनारकडे नेतृत्व

**संघ** : बिंदिसा सोनार (संघनायक, नाशिक शहर), श्रावणी भोसले (उपसंघनायक, सांगली), मोनिका पवार, राणी भुजंग व भाग्यश्री गायकवाड (जालना), साक्षी जाधव (परभणी), तनिष्का बोरकर (पिंपरी-चिंचवड), समीक्षा पाटील (नंदुरबार), मुग्धा शिर्के (रत्नागिरी), संस्कृती सुतार (सातारा), दृष्टी कुंभार (मुंबई शहर पश्चिम), आरती शेळके (ठाणे); प्रशिक्षक ज्ञानेश्वर ठोंबरे (परभणी), सहाय्यक प्रशिक्षक अशोक पानकडे (अहमदनगर), व्यवस्थापिका सुवर्णा लोखंडे (अहमदनगर).

# बजरंग पुनियाला आर्थिक मदत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपात्र ठरल्यानंतरही बजरंग पुनिया याला केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून आर्थिक मदत करण्यात आली आहे तसेच त्याचे वैयक्तिक प्रशिक्षक यांचा करार वाढवण्याची मागणीही मान्य करण्यात आली आहे.

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून सांगण्यात आले की, बजरंग पुनियाचे प्रशिक्षक काझी मुस्तफा यांच्यासोबतचा करार २४ मे २०२४पर्यंत वाढवण्याला परवानगी देण्यात आली आहे. पुनियासह टेबल टेनिस खेळाडू श्रीजा अकुला, मानस ठक्कर, पयास जैन, ज्युडो खेळाडू तुलिका मान यांच्या मागण्याही मान्य करण्यात आल्या आहेत.

# 'सीएसके'च्या चाहत्यांकडून सर रवींद्र जडेजाला मानवंदना

**चेन्नइ : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाला गुजरात टायटन्स संघाविरुद्धच्या सामन्यात चेपॉकच्या मैदानावर चाहत्यांकडून एक खास सन्मान देण्यात आला. चाहत्यांनी सामना सुरू झाल्यानंतर आठ मिनिटे जागेवर जागेवर उभे राहत सर जडेजाला मानवंदना दिली. आयपीएलच्या या सामन्यात सीएसकेने गुजरातवर ६३ धावांनी मात केली.

गेल्या मोसमातील अंतिम फेरीतील दोन्ही संघ या सामन्यादरम्यान आमनेसामने आले होते. त्या वेळी अंतिम सामना गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातच झाला होता, ज्यात विजय मिळवत सीएसकेने पाचव्यांदा आयपीएलचे जेतेपद पटकावले.

चेन्नईच्या या अंतिम सामन्यातील विजयात रवींद्र जडेजा हिरो ठरला होता. त्याने मोहित शर्माच्या गोलंदाजीवर चौकार मारून चेन्नईला चॅम्पियन बनवले. आता त्याच जडेजाला चेपॉकमध्ये त्याच फायनलिस्ट संघाविरुद्ध विशेष सन्मान दिला गेला.



सीएसकेचे सर्व चाहते आणि सोशल मीडिया अकाउंट्सने ही मानवंदना देण्याची घोषणा केली होती. अधिकृत इन्स्टाग्रामवर एक विशेष पोस्ट या सामन्यापूर्वी करण्यात आली होती आणि त्यात लिहिले होते की, आयपीएल २०२४चा सातवा सामना सुरू झाल्यानंतर ठीक ७.३८ वाजता चेपॉकमध्ये उपस्थित असलेले सर्व चाहते रवींद्र जडेजाला मानवंदना देण्यासाठी त्यांच्या जागेवर उभे राहतील. विशेष म्हणजे हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता सुरू झाला, पण चाहत्यांनी ७.३८ ही वेळ का निवडली यामागे खास कारण आहे.

जडेजाचे फायनलमधील कामगिरीसाठी आभार मानत त्याला मानवंदना देण्यासाठी ७.३८ ही वेळ निवडली, कारण जडेजाचा जर्सी क्रमांक हा ८ आहे आणि म्हणूनच आठ मिनिटे चाहते आपापल्या जागेवर उभे होते.

गेल्या आयपीएलच्या फायनलमध्ये रवींद्र जडेजाने फक्त सहा चेंडू खेळले, पण या सहा चेंडूंत तो संपूर्ण सामन्याचा हिरो ठरला. त्याने सहा चेंडूंत १५ धावांची नाबाद खेळी खेळली. त्याची ही खेळी संघासाठी निर्णायक क्षणी खूपच महत्त्वाची ठरली, कारण गुजरातचा विजय निश्चित दिसत होता, पण जडेजाने हा अटीतटीचा सामना चेन्नईच्या बाजूने वळवत संघाला चॅम्पियन बनवले. यानंतर कर्णधार महेंद्रसिंह धोनीने त्याला उचलून घेत सेलिब्रेशन केले होते.

# भारतीय फुटबॉल संघाच्या लाजिरवाण्या पराभवानंतर प्रशिक्षकाला हटवण्याची मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय फुटबॉल संघाला मंगळवारी मोठा धक्का बसला. अफगाणिस्तानने गुवाहाटीला झालेल्या सामन्यात भारताला २-१ अशा गोलफरकाने पराभव केला. त्यामुळे भारताच्या फिफा विश्वचषक २०२६ आणि आशिया कप २०२७साठीच्या क्वालिफायर्सच्या तिसऱ्या फेरीत पोहचण्याच्या आशांना सुरुंग लागला आहे. अशातच चाहत्यांकडून भारतीय पुरुष फुटबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक इगॉर स्टिमॅक यांना काढून टाकण्याची मागणी केली जात आहे.

हा सामना भारताचा कर्णधार सुनील छेत्रीचा १५०वा आंतरराष्ट्रीय सामना होता. त्याने या सामन्यात ३८व्या मिनिटालाच पेनल्टीवर अप्रतिम गोलही करीत भारताला आघाडी मिळवून दिली होती.

भारताने दुसऱ्या हाफमध्येही ही आघाडी कायम ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु ७०व्या मिनिटाला रेहमत अकबारीने अफगाणिस्तानला बरोबरी साधून दिली, तर शरिफ मुखम्मदने ८८व्या मिनिटाला दुसरा गोल करीत अफगाणिस्तानला आघाडी मिळवून दिली. त्यामुळे या सामन्यात ११७व्या स्थानी असलेल्या भारताला १५८व्या क्रमांकावरील अफगाणिस्तानकडून लाजिरवाणा पराभव स्वीकारावा लागला.

या पराभवामुळे भारताला तीन महत्त्वाचे गुणही मिळवता आले नाही, पण आता भारत दुसऱ्या फेरीत अ गटात भारताकडे चारच गुण आहेत, तर अफगाणिस्तानकडेही चार गुणच आहेत. कतार नऊ गुणांसह अव्वल क्रमांकावर आहे, तर कुवेत तीन गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे. आता भारताला तिसऱ्या फेरीत पोहचण्यासाठी आगामी उर्वरित दोन सामन्यांत मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे.

दरम्यान, गेल्या वर्षी भारतीय फुटबॉल संघाने शानदार कामगिरी केली होती. क्रमवारीतही १०० आतील स्थान मिळवले होते, परंतु त्यानंतर सातत्याने संघाची कामगिरी खालावली. आशिया कप २०२३ स्पर्धेतही भारताला सलग तीन सामन्यांतील पराभवासह स्पर्धेतून बाहेर पडावे लागले होते. त्यानंतर आता २१ मार्चला झालेल्या अफगाणिस्तानविरुद्ध सौदी अरेबियात झालेल्या सामन्यात भारताला गोल शुन्य बरोबरीतच समाधान मानावे लागले होते. त्यानंतर मायदेशातील सामन्यातही भारताला अफगाणिस्तानविरुद्ध पराभवाचा धक्का बसला आहे.

याशिवाय भारताने फिफा विश्वचषक आणि आशिया कपसाठीच्या क्वालिफायर्सच्या दुसऱ्या फेरीत कतारविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला आहे. भारताने या फेरीत केवळ कुवेत विरुद्ध विजय मिळवला आहे. यानंतर आता चाहते स्टिमॅक यांना प्रशिक्षक पदावरून दूर करावे यासाठी मागणी करीत आहेत.

यापूर्वी भारताच्या अपयशासाठी अनेकदा स्टिमॅक यांनी पायाभूत सुविधा, क्लब आणि खेळाडूंना दोषी ठरवले आहे, मात्र आता भारतीय संघाच्या मोठ्या अपयशानंतर चाहत्यांकडून त्यांच्यावर टीका केली जात आहे. त्यातच त्यांनी संघाच्या निवडीसाठी घेतलेल्या ज्योतिषी सल्ल्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# विराटने सांगितला कुटुंबासोबत घालवलेल्या काळाचा अद्भूत अनुभव

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १७व्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्ज संघावर चार विकेट्सनी विजय मिळविला. विराट कोहलीला त्याच्या शानदार अर्धशतकी खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. या वेळी त्याने खुलासा केली की, तो मागील काही दिवसांपूर्वी आपल्या देशात नव्हता तसेच तो जिथे त्याच्या कुटुंबाबरोबर वेळ घालवत होता, तिथे त्याला लोक ओळखत नव्हते.

विराट कोहली आपल्या दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत खेळू शकला नाही. दरम्यान, त्याने कुटुंबासोबत चांगला वेळ घालवला. आयपीएलमध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ७७ धावांची खेळी करून आरसीबीच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर विराटने सांगितले की, कुटुंबासह बराच वेळ घालवून चांगले वाटत आहे.

# आफ्रिदीचे कर्णधारपद धोक्यात!

### बाबर आझमकडे पुन्हा जाणार पाकिस्तान संघाचे नेतृत्व?

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**



पाकिस्तान क्रिकेटमध्ये काही ना काही बदल सातत्याने दिसून येत आहेत. आता जूनमध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्डकपपूर्वी संघाच्या कर्णधारपदात मोठा बदल होऊ शकतो, अशी बातमी समोर आली आहे.

बाबरने कर्णधारपद सोडून चार महिनेही उलटले नाहीत आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) त्याला तिन्ही फॉरमॅटमध्ये पुन्हा कर्णधार बनविण्याच्या विचारात आहे. वृत्तानुसार शान मसूद आणि शाहीन शाह आफ्रिदी यांच्या राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करण्याच्या क्षमतेवर पीसीबीचा विश्वास उडाला आहे. पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व करण्यासाठी माजी कर्णधार बाबर आझम हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे त्यांना वाटत आहे.

बाबरने गेल्या वर्षी भारतात झालेल्या एकदिवसीय वर्ल्डकपनंतर पाकिस्तानच्या सर्व फॉरमॅटमध्ये कर्णधारपद सोडले होते. यानंतर मसूदला टेस्ट फॉरमॅटमध्ये, तर शाहीनला टी-२०मध्ये कर्णधारपद देण्यात आले. आता पीसीबीच्या सूत्रांनी सांगितले की, बोर्ड या निष्कर्षापर्यंत पोहचला आहे की कोणताही पर्याय उपलब्ध नाही. बाबर हा पुन्हा संघाचे नेतृत्व करण्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहे.

सूत्रांनी पुढे सांगितले की, बाबर पुन्हा पदभार स्वीकारण्यास तयार आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी काही विश्वासू लोकांना पाठवले आहे, मात्र बाबरने स्पष्टपणे काहीही सांगितले नाही. वरवर पाहता त्याला बोर्डाच्या अध्यक्षांकडून काही आश्वासन हवे आहे.

जका अश्रफ पीसीबीचे अध्यक्ष असताना वर्ल्डकपनंतर लगेचच बाबरला पांढऱ्या चेंडूच्या फॉर्मेटमध्ये कर्णधारपदावरून हटवण्यात आले. यानंतर त्याने लाल चेंडूच्या कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला. बाबरने २०२३पासून सर्व फॉरमॅटमध्ये कर्णधारपद भूषवले होते, मात्र आशिया कप आणि वर्ल्डकपमधील खराब कामगिरीमुळे त्याला कर्णधारपदावरून हटवण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com